# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३ / श्रावण २, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)** | |
| **(५)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(६)** | **बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५४**

---

### औरगांबाद जिल्ह्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१) * १९३२६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरगांबाद जिल्ह्यात वाळुंज, रांजणगाव व पंढरपूर येथील औद्योगिक वसाहतीच्या क्षेत्रात गुटखा विक्री, मटका, लॉटरी, मुरुम चोरी, गावठी दारु, लॉजिंग, बुकी, रेती व्यवसाय व गॅस रिफिलिंग अश्याप्रकारचे अवैध धंदे / व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त अवैध व्यवसाय करणाऱ्यांना पोलीस प्रशासनाचे पाठबळ असून सदरहू व्यावसायिकांकडून वसूली करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून दलालांची नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबतची मागणी मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, औरगांबाद यांच्याकडे दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) होय.

मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या तक्रारीवरुन चौकशी करण्यात आली असून चौकशीत पोलीस प्रशासनाकडून बेकायदेशिर वसुली करण्यात येत असल्याबाबत निष्पन्न झाले नाही.

अवैध धंद्याविरुध्द पोलीसांमार्फत वेळोवेळी कायदेशिर कारवाई येते. त्यानुषंगाने एम.आय.डी.सी. वाळूंज पोलीस स्टेशन व पोलीस आयुक्तालय औरगांबाद अंतर्गत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

| **कारवाई प्रकार** | **सन २०२२** | | **सन २०२३ (जून अखेर)** | |
|---|---|---|---|---|
| | वाळूंज | शहर | वाळूंज | शहर |
| गुटखा | ०५ | ४० | ०३ | ०६ |
| जुगार | ५७ | १७५ | २१ | ६९ |
| अत्यावश्यक वस्तु कायदा | ०४ | १८ | ०१ | ०१ |
| अवैध दारू | २०८ | १०९९ | ७३ | ४६३ |
| अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम | ०१ | ०३ | ०१ | ०० |
| अंमली पदार्थ | ०६ | ४१ | ०२ | १५ |
| गौण खनिज | ०३ | ०८ | ०० | ०७ |

तसेच अवैध धंद्याविरुध्द कडक कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जनजाती सल्लागार परिषदेची बैठक घेणेबाबत

**(२) * १९९९६ श्री.आमश्या पाडवी : तारांकित प्रश्न क्रमांक १७८५१ ला दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जन जाती सल्लागार परिषद ही अनुसूचित जमातीच्या नागरिकांना देण्यात येणाऱ्या योजना व सुविधा यांचेकरीता सल्ला देण्यासाठी कार्यरत असून, जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक दिनांक २९ ऑगस्ट, १९६० च्या शासन निर्णयान्वये सर्वसाधारणपणे ६ महिन्यांतून एकदा घेणे आवश्यक असताना परिषदेची शेवटची ५० वी बैठक दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी घेण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सल्लागार परिषदेची दिनांक २३ जून,२०२२ रोजी आयोजित केलेली बैठक रद्द करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी सदर समितीची रचना होणे व बैठक घेणेबाबत नियमित पाठपुरावा करूनही अद्यापी बैठक घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत अनुसूचित जमातीच्या नागरिकांना देण्यात येणाऱ्या योजना व सुविधा यांचेकरीता सल्ला देण्यासाठीच्या जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

जनजाती सल्लागार परिषदेची शेवटीची ५० वी बैठक दिनांक ११ फेब्रुवारी,२०१९ रोजी घेण्यात आली होती. त्यानंतर राज्यात उद्भवलेल्या कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर बैठका घेण्यास बंदी असल्याने जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक झालेली नाही. यानंतर कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर दिनांक २३ जून,२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु,काही अपरिहार्य कारणामुळे सदर बैठक रद्द करण्यात आली.

(३) व (४) सद्य:स्थितीत दिनांक ५ जानेवारी,२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जनजाती सल्लागार परिषदेची पुर्नरचना करण्यात आलेली आहे.

जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## ठाणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत इमारतींना महारेराचे बनावट क्रमांक आढळून आल्याबाबत

**(३) * १९५८१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील कळवा, मुंब्रा, दिवा, कल्याण, डोंबिवलीलगत असलेली २७ गावे तसेच भिवंडीलगत असलेल्या खारबाव, मिठगावसारख्या पट्ट्यात उभ्या राहणाऱ्या अनधिकृत इमारतींना महारेराचे बनावट क्रमांक दिल्याची माहिती दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवलीतील (जि.ठाणे) महारेरा अनधिकृत नोंदणी घोटाळयातील अनधिकृत इमारतीमधील सदनिकांच्या खरेदी विक्री व्यवहारांची दस्त नोंदणी न करण्याच्या सूचना असतानाही सदनिकांची दस्त नोंदणी केल्याप्रकरणी संबंधित सह दुय्यम निबंधकावर दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील रामनगर व मानपाडा या दोन पोलीस स्टेशनमध्ये ६५ गृहप्रकल्पांवर मागील दोन महिन्यांत गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रामध्ये महारेरामध्ये बनावट नोंदणी दाखवून होत असलेली ग्राहकांची लूट थांबविण्याबाबत तसेच अनधिकृत सदनिकांची नोंदणी करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२) सह दुय्यम निबंधक कल्याण क्र.२ यांचे विरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने त्यांच्याकडून पदभार काढून घेण्यात आलेला आहे.

(३) व (४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील ६५ बांधकाम परवानगी पत्र बनावट असल्याचे निदर्शनास आल्याने मानपाडा पोलीस स्टेशन येथे २७ बांधकाम परवानगीबाबत दिनांक २७/०९/२०२२ रोजी एफआयआर क्र. ०७५० तसेच रामनगर पोलीस स्टेशन डोंबिवली येथे ३८ बांधकाम परवानगीबाबत दिनांक ०३/१०/२०२२ रोजी एफआयआर क्र. ३५० नुसार महापालिकेच्यावतीने विकासक व वास्तूविशारद यांचेवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी पोलीस विभागामार्फत एस.आय.टी. स्थापन करण्यात आलेली असून, गृह विभागामार्फत पुढील तपास सुरु आहे. महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणातर्फे सदर प्रकल्प रद्द करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील शिवमंदिरात प्रवेश करण्यावरुन धार्मिक तेढ निर्माण झाल्याप्रकरणी विशेष चौकशी समिती नेमण्याबाबत

**(४) * १९९३७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.महादेव जानकर, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील संदल मिरवणुकीच्या वेळी काही युवकांनी शिव मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करताना सुरक्षा रक्षकांनी मनाई केल्यामुळे वाद निर्माण होऊन धार्मिक तेढ निर्माण झाल्याची घटना दिनांक १३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १६ मे, २०२३ रोजी स्थानिक पोलिसांनी पाहणी करुन तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास पोलीस पथकासह त्र्यंबकेश्वर येथील स्थानिकांशी चर्चा करुन परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर संबंधितांविरुध्द अटकेची कारवाई केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्र्यंबकेश्वर मंदिर घटनेप्रकरणी अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांचे अध्यक्षतेखाली, विशेष चौकशी समिती (SIT) नेमून या घटनेसह गेल्या वर्षीच्या दंगल घडलेल्या घटनांची चौकशी करण्यात येईल असे मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांनी घोषित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) नाही.
(३) होय.
(४) सदर प्रकरणी अटकेची कारवाई करण्यात आलेली नाही. परंतु संबंधितांवर गु.र.क्र.१२४/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, या आरोपींविरुध्द सीआरपीसी १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. या प्रकरणी एसआयटी नेमण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे. तसेच, सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## धुळे जिल्ह्यातील आदिवासी समाज बांधवाना सलगतेने अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**(५) * १९७७८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात धुळे जिल्ह्यातील आदिवासी कोळी ढोर-टोकरे कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी आदि समाज बांधवांवर अन्याय होत असून त्यांना सलगतेने अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळावे या मागणीसाठी विरंगाना झलकारी बाई कोळी श्री शक्ती सामाजिक संस्थेच्या वतीने गीतांजली कोळी यांनी सुरू केलेले उपोषण दहाव्या दिवशीही सुरू असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोकरे कोळी समाज बांधवांचा आदिवासी अनुसूची यादी क्रमांक २८, २९,३० या क्रमांकावर समावेश असतानाही जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळविताना अडचणी येत असल्याने या प्रमाणपत्राअभावी सवलती मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याआधी दिनांक १५ फेब्रुवारी,२०२३ रोजी आदिवासी बांधवांनी मोर्चा काढूनही गेल्या अडीच महिन्यांत प्रशासनाने त्यावर कुठलीही कारवाई केली नसल्याने पुन्हा या समाज बांधवांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धुळे जिल्ह्यातील आदिवासी कोळी ढोर-टोकरे कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी, आदी समाज बांधवांवरील होणारा अन्याय दूर करण्याबाबत तसेच जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.

श्रीमती गीतांजली कोळी व इतर रा. वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे यांनी दिनांक २५/०४/२०२३ पासून उपोषण सुरु केले होते. सदरचे उपोषण हे दिनांक १२/०५/२०२३ रोजी मागे घेतलेले आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यात "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागावसर्गीय व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व सदर अधिनियम अंतर्गत पारीत महाराष्ट्र अनुसूचित जमाती (प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे) विनियमन सन २००३", दिनांक ०४/०६/२००३ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची व त्याच्या पडताळणीची कार्यवाही करण्यात येते. सदर अधिनियमातील तरतुदी या सर्व अनुसूचित जमातींना लागू असून त्यानुसार जात प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) हे खरे नाही.

श्रीमती गितांजली कोळी व इतर रा. वाडीभोकर रोड, देवपूर धुळे यांनी दिनांक १५/०२/२०२३ रोजी जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयाकडे निवेदन सादर केले होते. सदर निवेदन उपविभागीय अधिकारी, धुळे/शिरपूर यांचेकडे पाठविण्यात आलेले होते. त्यानुसार उपविभागीय अधिकारी यांचेकडून टोकरे कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी इ. जातीचे प्रमाणपत्र मिळणेकामी प्राप्त प्रस्तावात सादर करण्यात आलेले आवश्यक दस्ताऐवज व कागदपत्रांची पडताळणी करुन जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच उक्त अधिनियम, २००० मधील कलम ८ नुसार अर्जदार ज्या जमातीचे किंवा वर्गाचे आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदार व्यक्तीवर असते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जामखेड (जि.अहमदनगर) शहरातील नऊ वर्षाच्या मुलीचा घरावरून गेलेल्या मुख्य वीज वाहिनीला स्पर्श होऊन मृत्यू झाल्याबाबत

**(६) * १९६४२ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (जि.अहमदनगर) शहरातील जुन्या डी.जे.हॉटेल पाठीमागील भागात घरावरून गेलेल्या मुख्य वीज वाहिनीला स्पर्श झाल्याने नऊ वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाल्याची बाब माहे मे, २०२३ च्या चौथ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अरुंद असलेल्या रस्त्यावरून गेलेली मुख्य वीज वाहिनी शहराबाहेरून घेण्यात यावी अशी मागणी येथील नागरिकांनी करूनही अद्याप कारवाई न केल्याने अशा घटना पुन्हा घडण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विजेच्या धक्क्याने मृत्यूमुखी पडलेल्या मुलीच्या कुटुंबियाना तातडीने मदत देण्याबाबत तसेच अशा घटना पुन्हा घडू नये यासाठी वीज वाहिन्या इतरत्र हलविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जामखेड शहरातील मुख्य वीज वाहिनी इतरत्र हलविण्याबाबत जामखेड उप विभागात नागरिकांनी निवेदन सादर केले आहे.

(३) मयत मुलीच्या कुटुबिंयाना महावितरणातर्फे तातडीची मदत म्हणून रुपये २०,०००/-देण्याकरीता महावितरणचे कर्मचारी गेले असता त्यांनी सदर रक्कम स्वीकारण्यास नकार दिला. ११ के.व्ही. वीज वाहिनीमुळे अपघात टाळण्याकरीता तातडीची उपाययोजना म्हणून सद्य:स्थितीत जामखेड शहरातील अरुंद रस्त्यालगत असलेल्या ११ के.व्ही. वीज वाहिनीकरीता कोटेड कंडक्टरची व्यवस्था करण्यात आली असून सदर काम २ ते ३ दिवसात पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील खुशल स्टोन क्रशर एंटरप्राईजेस कंपनीला धमकी दिल्याबाबत

**(७) * १९६३४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) येथील खुशल स्टोन क्रशर एंटरप्राईजेस या कंपनीचा व्यवसाय बंद पाडून ५० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी स्वराज स्टोन क्रशरच्या इसमांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिनांक ४ मे, २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त व्यवसायात खंडणी, गुंडगिरी करून एकमेकांना धमकावणे अशा प्रकारच्या घटना घडल्या असून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) स्वराज स्टोन क्रशर सोबत करार करण्यास भाग पाडून आणि करार न केल्यास जबर दुखापत करण्याची व जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी स्वराज स्टोन एलएलपी संबंधित आठ जणांविरुध्द मे. खुशल एंटरप्रायजेसचे मालक यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक ०३/०५/२०२३ रोजी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २९२/२०२३, भादंवि कलम ३८७, ३२७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांनी रोहा तालुक्यातील आंबेवाडी ते निवी कालव्याचे पाणी बंद केल्याबाबत

**(८) * १९६७८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५३९६ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड यांनी आंबेवाडी ते निवी कालव्याचे पाणी बंद केल्याने विहिरी, नाल्यांना पाणी नसल्यामुळे, शेती ओसाड झाली आहे तसेच ग्रामस्थांसह पशुपक्षी, गुरेढोरे यांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंबेवाडी ते निवी कालव्याला पाणी सोडण्यात यावे यासाठी दिनांक १ मे, २०२३ पासून ग्रामस्थांनी रोहा तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी योजना राबविण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आंबेवाडी ते निवी कालव्याला पाणी सोडण्याबाबत तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जल जीवन मिशन अंतर्गत पाणी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

आंबेवाडी ते निवी गावादरम्यान काळ सिंचन प्रकल्पाचा रोहा शाखा कालवा असून सदर कालव्यावरील सायफनला मोठ्या प्रमाणात गळती असल्यामुळे कालवा ना-दुरुस्त आहे.

तथापि, कालव्याच्या सुरूवातीच्या भागातील दुरूस्ती करून माहे मे अखेरीस कि.मी. ५ पर्यंत पाणी सोडण्यात आले आहे.

कालव्यावरील नादुरूस्त बांधकामांची पुनर्बांधणी व इतर दुरूस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) होय,

ग्रामस्थांनी दिनांक ०१ मे, २०२३ रोजी उपोषण केले असून त्याच दिवशी कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन उपोषण कर्त्यांना रोहा शाखा कालवा दुरूस्तीचे प्रयत्न सुरू असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर उपोषणकर्त्यांनी त्याच दिवशी संध्याकाळी उपोषण मागे घेतले आहे.

(३) व (४) जलसंपदा विभागामार्फत आंबेवाडी ते निवी गावादरम्यानच्या काळ सिंचन प्रकल्पाच्या रोहा शाखा कालव्याची दुरूस्ती व कालव्यावरील नादुरूस्त बांधकामांच्या पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जल जीवन मिशन अंतर्गत पाणी उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही शासन निर्णय क्र.ग्रापाधो-२०२२/प्र.क्र.३७/पा.पु.-०७, दिनांक १४ जुलै, २०२२ अन्वये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगातील ५० टक्के पदे रिक्त असल्याबाबत

**(९) * १९०१७ श्री.प्रसाद लाड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक १०४४२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगामध्ये जवळपास ५० टक्के पदे रिक्त असल्याचे माहिती अधिकारात निदर्शनास आले असून आयोगातील न्यायाधिशांची संख्याही अपुरी असल्याने माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत २४१७० प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयोगासाठी मंजूर असलेल्या एकूण ५४ पदांपैकी सुमारे २८ पदे रिक्त असून राज्य मानवी हक्क आयोगावरील अध्यक्ष, सदस्य आणि कर्मचारी वर्गाची नियुक्ती एका महिन्यात करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी शासनाला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने आयोगाचे अध्यक्ष व २ सदस्यांची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने माहिती व निर्णय घेऊन वाढत्या तक्रारींची संख्या विचारात घेता प्रत्येक महसूल विभागाच्या ठिकाणी एक कार्यालय उभारून न्यायाधिशांची संख्या वाढवून ती किमान सात/आठ करणेबाबत तसेच उक्त २८ रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगासाठी मंजूर असलेल्या एकूण ५४ पदांपैकी सद्य:स्थितीत २५ पदे कार्यरत असून, २९ पदे रिक्त आहेत. शासनाने आयोगातील रिक्त पदे विचारात घेता, नियुक्ती प्राधिकारी- सचिव, राज्य मानवी हक्क आयोग यांच्यास्तरावर सेवाप्रवेश नियमानुसार भरावयाची पदे तसेच शासनाने २ वर्षाकरीता मंजूर केलेली एकूण १८ काल्पनिक पदे आवश्यकतेनुसार आयोगाच्या स्तरावर भरण्याबाबत आयोगास कळविले आहे.

तसेच आयोगात अध्यक्ष व १ सदस्य कार्यरत आहेत.

प्रलंबित प्रकरणांच्या बाबतीत जुनी २४५८३ प्रकरणे प्रलंबित होती व ४२२३ नव्याने प्राप्त झाल्याने एकूण २८८०६ प्रकरणे प्रलंबित झाली. त्यापैकी ३१७६ प्रकरणे निकालात काढण्यात आलेली असून, एकूण २५६३० प्रकरणे दिनांक ३१/१०/२०२२ रोजी प्रलंबित राहिली.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाने आयोगातील अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीसंदर्भात २५/१०/२०२१ पर्यंत कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. तसेच आवश्यक कर्मचारी देवून, आयोग कार्यान्वित करण्याबाबत न्यायालयाने सूचित केले होते.

(३) होय, हे खरे आहे.

शासनाने दिनांक ०३/१२/२०२१ रोजी अध्यक्ष व दोन सदस्य यांची नियुक्ती केली होती.

(४) मानवी हक्क संरक्षण अधिनियमाच्या कलम २१ नुसार राज्य मानवी हक्क आयोगामध्ये १ अध्यक्ष व २ सदस्य असतील, अशी तरतूद आहे. आयोगातील सदस्य संख्या वाढविण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाही.

शासनाने आयोगातील रिक्त पदे विचारात घेता, नियुक्ती प्राधिकारी- सचिव, राज्य मानवी हक्क आयोग यांच्यास्तरावर सेवाप्रवेश नियमानुसार भरावयाची पदे तसेच शासनाने २ वर्षाकरीता मंजूर केलेली एकूण १८ काल्पनिक पदे आवश्यकतेनुसार आयोगाच्या स्तरावर भरण्याबाबत आयोगास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील थकबाकीदार विकासकाला नवी योजना राबविण्यावर बंदी घालण्याबाबत

**(१०) * १८९३४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक १७८६६ ला दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील एकूण १५० योजनांमध्ये अंदाजे एकूण ६४७.४८ कोटी रूपये इतके भाडे थकीत असून त्यापैकी १२२.४० कोटी रूपये भाडे वसूल करण्यात आले असून तब्बल ५२५.०८ कोटी रूपये भाडे प्रलंबित असल्याची बाब दिनांक ११ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विक्री घटकावर स्थगिती, तसेच योजनेतून काढून टाकण्याचा इशारा देऊनही विकासक झोपडीवासीयांचे थकविलेले भाडे देत नाही, हे पाहून आता विकासकाला नवी योजना सादर करण्यावर बंदी आणण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे स्वरूप काय आहे आणि त्यांची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे तसेच उक्त प्रकरणी एकूण किती विकासकांनी भाडे थकविले आहे व एकूण किती रक्कम थकित आहे,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या मान्यतेस आणि अंमलबजावणीस होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, एकूण किती विकासकांना काळया यादीत टाकण्यात आले आहे तसेच थकलेले भाडे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.

आजमितीस सदर १५० योजनांमध्ये थकीत असणाऱ्या भाड्यापैकी जवळपास १५० कोटी पेक्षा जास्त भाडे वसूल करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) भाडे वसुलीबाबत सर्वंकष प्रयत्न करुन झोपडपट्टीधारकांना वेळेत भाडे देणे ही प्राथमिकता आहे.

यासाठी आजतागायत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

१. ३१ योजनांमध्ये विकासकांचे विक्री घटकातील बांधकाम थांबविले आहे.

२.१२ योजनांमध्ये कलम १३(२) अन्वये विकासकाची नियुक्ती रद्द केलेली आहे.

३.७ योजनांमध्ये कलम १३(२) अन्वये विकासकांविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

४.१०० योजनांमध्ये विकासकास भाडे अदा करण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

-----------------

## पुणे शहरातील म्हाडाच्या इमारतींचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(११) * १९०६४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बांधकाम व्यावसायिकांनी इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर सोसायटीकडे अभिहस्तांतरण करणे आवश्यक असतानाही अनेक गृहनिर्माण संस्थांचे अदयापही मानीव अभिहस्तांतरण करण्यात आलेले नाही त्यामुळे राज्य तसेच पुणे शहरातील म्हाडाचा इमारतींचा पुनर्विकास तसेच डीम्ड कन्व्हेअन्स अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोसायटीचे अभिहस्तांतरण न झाल्यास भविष्यामध्ये सोसायटीचा पुनर्विकास करावयाचा असेल तर चटई क्षेत्र निर्देशांक (Floor Space Index FSI) वाढवून मिळत नाही तसेच हक्काचा पुरावा म्हणून मिळकत पत्रिका अथवा संपत्ती पत्रिका मिळत नाही आणि त्यामुळे पुढील खरेदी-विक्री व्यवहार देखील होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रलंबित असणाऱ्या हजारो मानीव अभिहस्तांतरणाची प्रकरणे निकाली काढण्याबाबत तसेच पुणे शहरातील म्हाडाच्या इमारतींचा पुनर्विकास तसेच डीम्ड कन्व्हेअन्स करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण झाल्याशिवाय मिळकत पत्रिका अथवा संपत्ती पत्रिका मिळत नाही.
मात्र, संस्थांचे अभिहस्तांतरण न झाल्यास चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून मिळत नाही व खरेदी-विक्री व्यवहारही होत नाही, हे खरे नाही.
(३) मानीव अभिहस्तांतरण आदेश व प्रमाणपत्र देण्यासंदर्भांत अनुसरावयाची कार्यपध्दती सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक २२/०६/२०१८ व दिनांक ३१/०५/२०२३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली आहे.
म्हाडाच्या पुणे मंडळामार्फत विकसित करण्यात आलेल्या भूखंडावरील इमारती/ वसाहतीमध्ये एकूण २८८ सहकारी गृहनिर्माण संस्था असून, ११३ गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण झाले तर, १७५ गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण व्हायचे आहे. गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरणाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी पुणे मंडळाकडून पुणे शहरातील अभिहस्तांतरण बाकी असलेल्या गृहनिर्माण संस्थांना अभिहस्तांतरण करुन घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

-----------------

## मनवेल पाडा (विरार) येथे महावितरणच्या रोहित्राच्या संपर्कात आल्याने मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना आर्थिक मदत देऊन दुर्घटनेची सखोल चौकशी करणेबाबत

**(१२) * १८९०४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार येथील मनवेल पाडा येथे महावितरणच्या रोहित्राच्या संपर्कात आल्याने मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना तातडीची मदत अदा करण्यासह दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी मा.ऊर्जा मंत्री महोदयांकडे मा.लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि तदनुषंगाने सदरहू दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना तातडीची आर्थिक मदत अदा करण्याबाबत तसेच दुर्घटनेची सखोल चौकशी होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

विरार पूर्व येथील मनवेलपाडा येथे दिनांक १३/०४/२०२३ रोजी रात्री मिरवणूकीदरम्यान वीजेचा धक्का लागून २ तरुण मुले मृत्यू पावले तसेच ७ जण गंभीर जखमी झाले. त्याची चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे.
(२) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, पालघर यांच्यामार्फत अपघाताची चौकशी दिनांक १४/०४/२०२३ रोजी करण्यात आली. अपघातग्रस्तांमधील दोन मृत व्यक्तिंच्या नातेवाईकास महावितरण कंपनीकडून नुकसान भरपाई रक्कम प्रत्येकी रुपये ४,००,०००/- मंजूर करण्यात येवून दिनांक ०६/०७/२०२३ रोजी अदा करण्यात आले आहे. तसेच जखमी व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वाच्या टक्केवारीनुसार नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पहिल्या मजल्यावरील झोपडीवासियांना मोफत घराचा लाभ मिळणेबाबत.

**(१३) * १८८७६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या चाळींच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेनुसार पुनर्विकास करताना पहिल्या किंवा त्यावरील मजल्यावर राहणाऱ्या रहिवाशांना मोफत घराचा लाभ देता येत नसल्याने जुन्या चाळींचा झोपू योजनेनुसार पुनर्विकास करण्यात अनेक अडचणी निर्माण झाल्या असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाळीतील पहिल्या मजल्यावरील भाडेकरूना पंतप्रधान आवास योजनेच्या निकषानुसार घर देण्याबाबतची चाचपणी शासनाकडून करण्यात येत आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याशिवाय या रहिवाशांना झोपू योजनेत उपलब्ध होणाऱ्या प्रकल्प बाधितांसाठी असलेल्या सदनिका उपलब्ध करून मिळण्याबाबत शासन काही ठोस भूमिका घेणार आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील प्रलंबित झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प तातडीने मार्गी लावण्यासाठी झोपू योजनेतील पहिल्या मजल्यावरील राहणाऱ्या रहिवाशांना मोफत घराचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) चाळीतील पहिल्या मजल्यावरील रहिवाशी प्रधानमंत्री आवास योजनेच्या अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास उक्त योजनेचा लाभ घेऊ शकतील.

(३) सन, १९७६ पूर्वीच्या व सध्या अस्तित्वात असलेल्या चाळींच्या पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या रहिवाश्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसन सदनिकेचा लाभ देण्याच्या प्रस्तावास शासनाची तत्वत: मंजुरी देण्यात आली आहे. तसेच अंतिम मान्यतेच्या अनुषंगाने शासनास सादर करण्याकरिता सविस्तर प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मागविण्यात आला आहे.
(४) तथापि, झोपडपट्टीतील पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या झोपडीधारकांना पुनर्वसन सदनिकांचा लाभ देण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळांच्या कर्ज प्रकरणांबाबत

**(१४) * १९८१० श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सन २०१८ मध्ये आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना केली असून, मराठा समाजातील वार्षिक ८ लाखांहुन कमी उत्पन्न असलेल्या तरुणांना उद्योगांसाठी १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागास विकास महामंडळाला दर वर्षाला किमान २५०० तरुणांना कर्ज देण्याचे उद्दिष्ट दिलेले असून महामंडळाच्या स्थापनेपासून हे उद्दिष्ट एकाही वर्षात पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाड्यातील ३३,७४० बेरोजगारांनी महामंडळाकडे ऑनलाईन अर्ज दाखल केले होते, परंतु पैकी ५० टक्के अर्ज विविध बँकांनी तारण व २ गॅरंटरची अट टाकून निकाली काढल्याने बेरोजगारांना मदत होऊ शकली नाही, महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्ज प्रकरणी बँका कर्ज मंजुरी देताना टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील बँकावर कारवाई करून अशा बेरोजगार युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने त्यांच्या कर्जांना तारण व गॅरंटी देण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ओहत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महामंडळाच्या योजनांतर्गत लाभार्थ्यांना थेट कर्ज वितरित करण्यात येत नसून, लाभार्थ्यांनी त्यांच्या व्यवसायाकरीता बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा महामंडळाकडून लाभार्थ्यांना देण्यात येतो.
(२) हे खरे नाही.

महामंडळाच्या योजनांतर्गत लाभार्थ्यांना थेट कर्ज वितरीत करण्यात येत नसून, लाभार्थ्यांनी त्यांच्या व्यवसायाकरीता बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा परतावा महामंडळाकडून लाभार्थ्यांना देण्यात येतो. या संदर्भात प्रति वर्षी महाराष्ट्रातील विविध बँकांकडून सरासरी एकूण १२,३०० प्रकरणे मंजूर करण्यात येतात.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) १) बेरोजगार युवकांना प्रोत्साहान देण्यासाठी त्यांच्या त्यांना बँकांमार्फत कर्ज मिळावे यासाठी महामंडळ जिल्हा समन्वयक यांच्या संख्येमध्ये वाढ करुन लाभार्थी व बँक यांच्यात समन्वय वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

२) वेळोवेळी जिल्हाधिकारी व बँकर्स यांची उपस्थितीत बॅकर्स व लाभार्थी यांच्यामध्ये संवाद घडवून आणून, आढावा बैठका घेवून, कर्ज वितरणासाठी येणाऱ्या अडचणींची निराकरण करण्यात येत आहे.

३) तसेच केंद्र शासनाच्या CGTMSE व CGFMU या योजनांतर्गत लाभार्थ्यांच्या कर्जावरील क्रेडिट गॅरेंटी इन्सूरन्स प्रिमियम (Insurance Premium) रक्कम भरणा केल्या नंतर सदर रक्कम महामंडळामार्फत लाभार्थ्यांच्या खात्यात मागणी प्रमाणे जमा करण्यात येत आहे.

४) या संदर्भात मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांच्या स्तरावर होणाऱ्या बँकांच्या विविध आढावा बैठका (SLCC/DLCC) दरम्यान बँकेंना सूचना देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोलीस स्थानकांच्या आवारातील विविध गुन्हयात वापरलेल्या तसेच अपघातग्रस्त वाहनांवर विहीत कालावधीत कार्यवाहीचे धोरण निश्चित करण्याबाबत

**(१५) * १९९६८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस स्थानकाच्या आवारात अनेक गुन्ह्यांमध्ये वापरलेली अथवा अपघातग्रस्त झालेली वाहने स्थानिक पोलीसांकडून जप्त करण्यात येवून उभी करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही वाहने संबंधित वाहन मालकांकडून योग्य ती कायदेशीर कार्यवाही पूर्ण करून नेण्यात येत नसल्याने अथवा मा.न्यायालयाच्या सुपूर्तनाम्यानुसार सोडविली जात नसल्याने कालांतराने या वाहनांचे सुटे भाग काढून टाकण्यात आल्याच्या तक्रारीही प्राप्त होत असतात परंतु यामध्ये बराच कालावधी गेल्याने सदरहू वाहने ही भंगारात परिवर्तित झाल्याने ती तशीच वर्षानुवर्षे पडून राहत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस स्थानकांच्या परिसरात भंगार मोठ्या प्रमाणात निर्माण होत असून सदरहू वाहने ही वर्षानुवर्षे अशीच पडून राहत असल्याने पोलीस स्थानकासोबतच परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असून सदरहू वाहनांवर किती कालावधीत आणि कोणती कार्यवाही करण्यात यावी याबाबत शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशीअंती धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरं आहे.

(२) पोलीस ठाण्यांच्या अभिलेखी गुन्हयात/ अपघातामध्ये जप्त केलेल्या वाहनांबाबत संबंधित वाहन मालकाने योग्य ती कायदेशीर कार्यवाही पूर्ण केल्यास त्यांना मा.न्यायालयाच्या सुपुर्तनाम्यानुसार संबंधित वाहन मालकाच्या ताब्यात देण्यात येते. परंतु, मा.न्यायालयाकडून सुपुर्तनामा प्राप्त होण्यास किंवा मूळ

मालकाचा शोध लागण्यास विलंब होत असल्याने नमुद वाहने पोलीस ठाणे आवारात ठेवण्यात येतात. भंगारात परावर्तीत झालेल्या जप्त वाहनांबाबत वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने योग्य ती विल्हेवाट संबंधित पोलीस स्टेशनकडून लावण्यात येते. तसेच, शासकीय ठेकेदारामार्फत त्यांची विक्री करून जमा झालेली रक्कम शासकीय खात्यात जमा करण्यात येते. पडून असलेल्या वाहनांचे सुटे भाग काढून टाकल्याबाबत तक्रारी प्राप्त नाहीत.

(३) व (४) पोलीस ठाण्यांकडून गुन्हयात/ अपघातामध्ये जप्त करण्यात आलेली वाहने हे पोलीस ठाणे लगतच्या मोकळया जागेत व्यवस्थित पार्क करण्यात येत असून या परिसरात दैनंदिन स्वच्छता करण्यात येते. नमुद वाहनांमुळे परिसरातील नागरीकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात येते.

पोलीस ठाण्यातील जप्त वाहनांबाबत ज्या गुन्हयांचा निकाल लागला आहे, त्या गुन्हयात मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वाहनांची निर्गती करण्यात येते. नमुद वाहने ही जास्त कालावधीकरीता पोलीस ठाणे आवारात किंवा उभी असलेल्या परिसरात पडून राहू नये म्हणून नमुद वाहनाबाबत मा.न्यायालयास पत्रव्यवहार करून वाहनांची निर्गती करण्याबाबत मा.न्यायालयांचे आदेश प्राप्त करून त्यानुसार संबंधित पोलीस ठाण्यांकडून कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे याबाबत वेगळयाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोच्छी (ता.सावनेर, जि.नागपूर) गावाजवळील कन्हान नदीवर प्रस्तावित कोच्छी बॅरेजबाबत

**(१६) * १८९५९ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराच्या परिघात वाहणाऱ्या गोदावरी खोऱ्याच्या प्राणहिता उपखोऱ्यातील तसेच महाराष्ट्र व मध्य प्रदेशच्या सीमेपासून आठ कि.मी. बाजूस कोच्छी (ता.सावनेर, जि.नागपूर) गावाजवळ कन्हान नदीवर प्रस्तावित कोच्छी बॅरेजचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प जवळजवळ पूर्ण झालेला असताना नागपूर शहरातील पाण्याच्या टंचाईसाठी वरदान ठरणाऱ्या या प्रकल्पात पाणी अडविण्याकरीता विलंब होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाची सद्य:स्थिती जाणून घेण्याकरीता व पाणी अडविण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

कन्हान नदी प्रकल्प (कोच्छी बॅरेज) अंतर्गत बॅरेजचे स्थापत्य कामे ९०% पूर्ण झालेले असून द्वारे उभारणीची कामे प्रगतीपथावर आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पांतर्गत तीन गावाचे (कोच्छी, ढालगाव खैरी, रायवाडी जुनी) पुनर्वसन प्रस्तावित आहे. सद्य:स्थितीत कोच्छी बावनगावचे नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असून पुनर्वसनाचे कामे प्रगतीपथावर आहे. मौजा-रायवाडी (जुनी) च्या पुनर्वसनाची कामे अंतिम टप्यात आहेत तसेच मौजा – ढालगाव खैरीच्या पुनर्वसनाबाबतची कार्यवाही सुरु असून प्रगतीपथावर आहेत.

प्रकल्पाच्या मंजूर द्वितीय सुप्रमापेक्षा जास्त खर्च झाल्याने उर्वरीत बांधकामाच्या खर्चावर मर्यादा आलेल्या आहेत. द्वितीय सुप्रमाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. सुप्रमा प्रस्तावास मान्यता प्रदान केल्यानंतर उर्वरीत कामे पूर्ण करून जुन, २०२४ मध्ये प्रकल्पात पाणीसाठा करण्याचे नियोजन आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागातील कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी कौशल्य विकास प्रशिक्षणाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल प्राप्त होणेबाबत

**(१७) * १९२९३ श्री.सुरेश धस : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक ९८३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागातील सुमारे १५० कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक १ जानेवारी, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधी दरम्यान राबविण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षणाबाबतचा सविस्तर वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आलेला असून, सदर अहवाल अद्याप शासनाला प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी वरिष्ठ पातळीवरून कारवाई करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विलंब करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करून सदरील भ्रष्टाचाराची रक्कम जमीन महसूलाप्रमाणे वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे कार्यालयीन आदेश दिनांक ०२ ऑगस्ट, २०२१ अन्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. तथापि, सदर समितीमध्ये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी तक्रार कालावधीत कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्याने आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारींची चौकशी समिती गठीत करण्यात आली. परंतु यासंदर्भात आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी चौकशी समिती शासन स्तरावरून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १५ मे, २०२३ अन्वये संचालक, वित्त व लेखा कक्ष, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) परिसरातील भोसरी, इंद्रायणी नगर भागात रोहित्राचा स्फोट होऊन मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना भरपाई मिळणेबाबत

**(१८) * १९५०५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरी, इंद्रायणी नगर (पिंपरी चिंचवड, जि.पुणे) भागात रोहित्राचा स्फोट होऊन मृत्यूमुखी पडलेल्या तिघांच्या वारसांना महावितरण आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी संयुक्तरित्या दहा लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने नुकतेच दिले असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या अपघाताला दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश आयोगाने दिले असून त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) मृत्यूमुखी पडलेल्या तिघांच्या वारसांना, महावितरणच्या नियमानुसार प्रत्येकी रुपये ४ लाख याप्रमाणे एकूण रुपये १२,००,०००/- दिनांक १२/१०/२०२० रोजी देण्यात आले आहेत. उर्वरित रकमेबाबतची कार्यवाही प्रक्रियाधिन आहे. महावितरणने अपघातास दोषी असणाऱ्या अधिकाऱ्याची खातेनिहाय चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने ५ अधिकारी व २ कर्मचारी यांचेवर कंपनीच्या नियमाप्रमाणे आरोपपत्र दाखल करुन व त्यांची चौकशी करुन, दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द महावितरण कंपनीच्या नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुतांश पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१९) * १९११६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या ३० वर्षांपासून पाटबंधारे प्रकल्पांमध्ये १०० टक्के पाणीसाठा झाला असून तर काही प्रकल्पांची कामे अपूर्णावस्थेत असल्याने या प्रकल्पांमध्ये पाणीसाठा झाला आहे तेथे कालवे आणि वितरिकांची कामे अपूर्ण असल्याने पाणी असूनही १००% क्षेत्र ओलिताखाली आणण्यात मर्यादा येत असल्याचे माहे मे,२०२३ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाकडील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पांची एकूण सिंचन क्षमता ८७ हजार ८८६ हेक्टर असून सद्य:स्थितीत सुमारे १५०७३ हेक्टर सिंचन क्षमतेची निर्मिती झाली आहे, तर प्रत्यक्षात सिंचनाखालील क्षेत्र हे केवळ ५४३८ हेक्टर एवढेच असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाळंबा (ता.कुडाळ) या प्रकल्पाची सिंचन क्षमता २८ हजार ९०० हेक्टर असून मात्र या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रखडलेले पाटबंधारे प्रकल्प तसेच अपूर्ण असलेले कालवे व वितरीकांची कामे तातडीने पूर्ण करून तेथील जमीन ओलिताखाली आणण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात २ मोठे, ५ मध्यम व ८ लघु असे एकूण १५ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. तसेच शिवडाव हा १ लघु प्रकल्प पूर्ण आहे. बांधकामाधिन प्रकल्पांपैकी तिलारी, अरुणा, देवघर, कोर्लेसातंडी, देंदोनवाडी व तरंदळे या प्रकल्पावर १०० टक्के पाणीसाठा झाला असून कालवा वितरण व्यवस्थेची/ PDN ची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच नरडवे प्रकल्पांतर्गत को.प. बंधाराद्वारे पाणीसाठा होतो. ओटाव व नाधवडे प्रकल्पांवर अंशत: पाणीसाठा करण्यात येत आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात येणारे सर्व प्रकल्पांच्या एकूण ९९६६५ हे. प्रकल्पीय सिंचन क्षमतेपैकी पूर्णतः व अंशतः पाणीसाठा झालेल्या प्रकल्पांद्वारे १६२५८ हे. सिंचन निर्मिती झालेली आहे.
(३) तळंबा प्रकल्पाची सिंचन क्षमता २८ हजार ९०० हेक्टर असून तळंबा प्रकल्पास रुपये ७२३७.९१ लक्ष (दरसुची १९७९-८०) किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यांनतर शासन निर्णय क्रमांक तळंबा/६९८/(२८७/९९)मोप्र-१,दिनांक १ जुलै १९९९ अन्वये रुपये ३८८१८.८५ लक्ष (दरसुची १९९९-२०००) किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच प्रकल्पास शासन निर्णय/ तळंबा /०१०८/५०/ (२६ /२०८) / मोप्र-१ दिनांक ११ नोव्हेंबर, २००८ अन्वये रुपये ८१६६४.५५ लक्ष किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.
(४) उपलब्ध पाण्याचा उपयोग होणेसाठी विभागाच्या धोरणाप्रमाणे कालवा वितरण प्रणाली/ बंद नलीका वितरण प्रणालीव्दारे (PDN) द्वारे जमीन ओलिताखाली आणणेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम महाराष्ट्रातील अतिरिक्त पाणी मराठवाड्याकडे वळविणेबाबत

**(२०) * १९०५० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १७१८८ ला दिनांक १० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील शेती सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावण्यासाठी राज्य सरकारने नदीजोड प्रकल्प प्रस्तावित केला असून यात पार- गोदावरी योजनेद्वारे पार नदीतुन पाणी उचलुन नाशिकमधील करंजवन, पुणेगाव या धरणात सोडण्यात येणार आहे, तर दुसऱ्या प्रस्तावित योजनेमध्ये दमणगंगा वैतरणा-गोदावरीचे पाणी पाईपलाईनव्दारे कदवा धरणामध्ये (ता.सिन्नर जि.नाशिक) सोडले जाईल आणि तिसऱ्या नदीजोड योजनेत दमणगंगा-एकदरे गोदावरी या योजनेचे पाणी नाशिक जिल्ह्यातील वाघाड धरणात सोडण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, ही तिनही धरणे भरल्याशिवाय मराठवाड्यास पाणी मिळणार नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या तिनही नदीजोड योजना मराठवाड्यातील पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी प्रस्तावित केलेल्या असतानाही नाशिककरांनी या योजनांचे पाणी स्वतःच्या जिल्ह्यातील विविध धरणांमध्ये वळवून सिंचनक्षमता वाढविल्याचे स्पष्ट होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पाणी वळविण्यासाठी लागणारा ३५ हजार कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे काय, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे, तसेच, ४० कलमी कार्यक्रम राबविण्याबाबतच्या घोषणेची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात कोणकोणती कामे करण्यात आली आहेत वा येत आहेत

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने मराठवाड्यातील पाण्याची तुट भरुन काढण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

१.पार-गोदावरी नदीजोड योजना क्र. ३ व ४ या योजनेच्या मंजूर सर्वसाधारण आराखड्यानुसार योजनेच्या कामाची व्याप्ती पार खोऱ्यात उपलब्ध झालेले पाणी उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील अस्तित्वातील पुणेगाव धरण व करंजवन धरणा पर्यंत पाणी वळविण्याचे प्रस्तावित आहे.

२.दमणगंगा-एकदरे-गोदावरी ता.पेठ, जि.नाशिक व दमणगंगा-वैतरणा-गोदावरी. (कडवा-देवनदी) ता.मोखाडा, जि.पालघर या नदीजोड योजनेचे पाणी उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील वाघाड धरणाद्वारे जायकवाडी धरणात सोडण्यात येणार आहे.

३.दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा- देवनदी) ता.मोखाडा, जि.पालघर हा नदीजोड योजनेसाठी वैतरणा खोऱ्यातुन उपसा करून गोदावरी खोऱ्यात बोरखिंड धरणात वळवून नाशिक जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त सिन्नर तालुक्यातील घरगुती, औद्योगीक वापरासाठी, डीएमआयसी (Delhi Mumbai Industrial Corridor) सिन्नर व ४० दलघमी पाणी मराठवाडा विभागाच्या सिंचन वापराकरीता प्रस्तावित आहे.

त्यानुसार तीनही योजनामधून एकूण ३३४.९२९ दलघमी पाण्यापैकी २०९.५५९ दलघमी पाणी मराठवाड्यासाठी वळविणे प्रस्तावित आहे. त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम करण्याचे काम सुरु आहे.

वरील तीनही योजनांमधून मिळणारे पाणी हे सध्या उपलब्ध होणाऱ्या पाण्याव्यतिरिक्त असल्याने उर्ध्व गोदावरी (जायकवाडी पर्यंत) खोऱ्यामध्ये ३३४.९२९ दलघमी एवढे उपलब्ध होणार असून या खोऱ्यातील तुट भरून येण्यासाठी उपयोगी ठरणार आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नाही.

पार गोदावरी नदीजोड योजना क्र.३ व ४ चा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) छाननीस्तव महामंडळ कार्यालयाचे पत्र दिनांक ३०/०७/२०२१ अन्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीस सादर करण्यात आलेला असून अहवालाची छानननी प्रगतीत आहे.दमणगंगा-एकदरे-गोदावरी योजनेचा अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांचे पत्र दिनांक ३०/०६/२०२३ अन्वये प्राप्त असून अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल तपासण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (कडवा-देवनदी) योजनेचा अंतिम सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जल विकास अभिकरण यांच्याकडून तयार करण्यात येत असून सप्टेंबर, २०२३ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

उपरोक्त नुसार सविस्तर प्रकल्प अहवाल अंतिम झालेनंतर प्रकल्पाची अंदाजित किंमत निश्चित करणे शक्य आहे तसेच उपरोक्त क्षेत्रिय स्तरावरील कार्यवाही पूर्ण झाल्यांनतर राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती यांची मान्यता व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. तदनंतर राज्याच्या आर्थोपायाच्या स्थितीनुसार व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशानुसार प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचा महापुरापासून बचाव करण्यासाठीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी झालेली नसल्याबाबत

**(२१) * १८८१२ श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक १४१३९ ला दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१९ आणि २०२१ साली कोल्हापूर जिल्ह्यासह सांगली जिल्ह्याला महापुराचा जबर तडाखा बसला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर शहरात येणारी वाहतूक बंद होऊ नये यासाठी शिरोली ते उचगाव दरम्यान बास्केट ब्रिज उभारण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री यांनी केली होती, महामार्गावरील भराव कोल्हापूर शहर आणि परिसरात महापूर पसरविण्यास कारणीभूत ठरत असल्यामुळे महामार्गाचे सहा पदरीकरण करताना हा भराव काढून टाकणे तसेच कोल्हापूर शहरात पंचगंगा नदीकाठी पूर संरक्षक भिंत बांधण्यासह अनेक निर्णय घेण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व घोषणांची पूर्णपणे अंमलबजावणी आजमितीस झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महापुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कोल्हापूर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार, कोल्हापूर शहरात येणाऱ्या वाहतूकीकरीता कोल्हापूर एंट्री रॅम्प (बास्केट ब्रीज) ची तरतूद कागल-सातारा सहा पदरीकरण कार्यामध्ये केलेली आहे. सदर पुलासाठी भरावाऐवजी पिलर्सचे नियोजन आहे. त्यामुळे महापुरास अडथळा होणार नाही.

३ लेनचा ब्रिज पंचगंगा नदीवर प्रस्तावित असून कोल्हापूर प्रवेशाकरिता महामार्गावरुन उड्डाणपूल बांधण्याचे नियोजन आहे. महापूर परिस्थितीत पाण्याचा जलद निचरा होणेकरीता भरावाचे एकूण १३ ठिकाणी ३x४ मीटर आकाराचे बॉक्स कल्वर्ट बांधण्याचे नियोजन आहे. सहा पदरीकरण कार्यास दिनांक १३/०१/२०२३ पासून सुरुवात झालेली आहे.

कोल्हापूर शहर व परिसरासाठी सादर केलेल्या पूर उपाययोजनांमध्ये पंचगंगा नदीसाठी काटछेद सुस्थितीत आणणे व आवश्यक ठिकाणी पूरसंरक्षक कामे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहेत.

(३) व (४) पूर उपाययोजना कामांच्या प्राथमिक प्रकल्प अहवालास शासनाने मान्यता दिली आहे. Maharashtra Resilience Development Programme (MRDP) या प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून रुपये २२४० कोटी एवढया रक्कमेच्या कर्जासंबंधित प्राथमिक प्रकल्प अहवाल (PPR) दिनांक २३/०५/२०२३ रोजी वित्त विभागामार्फत DEA च्या पोर्टलद्वारे DEA, जलशक्ती, मंत्रालय व निती आयोग यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध विभागांचा सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(२२) * १९७४९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांनी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये केवळ ६६ टक्के निधी खर्च केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे अर्थसंकल्पातील निधी खर्च करण्यात राज्य शासन अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय विभागांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून खर्चाचे योग्यरीत्या नियोजन करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निदेश देण्यात आलेले असतानाही हा निधी अखर्चित ठेवण्यामागील थोडक्यात कारणे काय आहेत,

(४) असल्यास, निधी अखर्चित ठेवणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सुधारित अंदाजाच्या तुलनेत ८९.४७ टक्के इतका खर्च झाला आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळा/महाविद्यालयांमध्ये सौर ऊर्जा पॅनल उपलब्ध करून देणेबाबत

**(२३) * १९५४९ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळा/महाविद्यालयांना सौर ऊर्जा पॅनेल उपलब्ध करून देणेबाबत कोणतीही कार्यवाही शासनामार्फत करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने शाळा/महाविद्यालयांना सौर ऊर्जा पॅनेल उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण, २०२० मधील तरतूदीनुसार सौर संयंत्रांची योजना राबविण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागाने त्यांच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करुन दिल्यास महाऊर्जामार्फत तांत्रिक मान्यता प्रदान करुन प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल. त्यानुसार महाऊर्जामार्फत जिल्हा वार्षिक योजना, अनुसुचित जाती, आदिवासी उपयोजना इ. योजनेततून जिल्हा परिषद शाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, समाजकल्याण अंतर्गत शासकीय निवासी आश्रमशाळा, शासकीय तंत्रनिकेतन इ. साठी सौर संयंत्र आस्थापित करण्यासाठी तांत्रिक मान्यता देऊन त्यानुसार संबंधित विभागाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येते.

सन २०१९-२० पासून एकूण १४५० शाळा/महाविद्यालय व इतर यांच्या सौर संयंत्र आस्थापित करण्याच्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येऊन एकूण ५६६५ कि.वॅ. क्षमतेचे सौर संयंत्र आस्थापित करण्यात आलेली असून ती कार्यरत आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेमधील रिक्त पदे भरणेबाबत

**(२४) * १९२८२ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १७७२८ ला दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील एकूण ५६७ पदे रिक्त असल्याने ४ वर्षांपासून लाचेच्या प्रकरणातील अहवाल प्रलंबित असून बालंकावरील लैंगिक अत्याचार (पोक्सो) संबंधी माहे जानेवारी, २०२३ अखेर १८२५ प्रकरणे प्रलंबित असून, जानेवारी, २०२३ अखेरपर्यंत १२६२ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, "गट-अ" संवर्गातील २९ पदांचे मागणीपत्र तसेच गट-ब संवर्गातील ५० विविध पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून सदर मागणीपत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून गट-अ मधील उपसंचालक संवर्गातील ५ उमेदवारांची व गट-ब मधील वैज्ञानिक अधिकारी (सायबर गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) संवर्गातील १७ उमेदवारांची शिफारसपत्रे शासनास प्राप्त झाली असून सदर उमेदवारांना नियुक्ती देण्याची प्रक्रीया पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या उर्वरीत संवर्गातील मागणीपत्रांच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारसपत्रे प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती देण्याची कार्यवाही चालू करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेत एकूण ५६७ रिक्त पदे भरणेबाबत तसेच प्रलंबित असलेली प्रकरणे निकालात काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) संचालनालयात दिनांक ३०/०५/२०२३ रोजी एकूण ४७८ पदे रिक्त आहेत. राज्यातील सर्व न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमधील माहे जानेवारी, २०२३ अखेर बालकांवरील लैंगिक अत्याचार (पोक्सो) १८२५ इतकी प्रकरणे प्रलंबित असून महिलांवरील गुन्हयासंबंधीच्या डी.एन.ए.(३७६ IPC) १२६२ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त झालेल्या गट-अ मधील ५ आणि गट-ब मधील १७ उमेदवारांच्या दस्तावेजांची पडताळणी करुन पदस्थापना करणेबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) व (४) गट-अ संवर्गातील १७ आणि गट ब संवर्गातील ३३ पदांसाठी भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अंतिम टप्प्यात आहे. या संवर्गातील उर्वरीत रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-क संवर्गाची पदे संचालनालयामार्फत टि. सी. एस. व्दारे भरतीप्रक्रिया सुरु करण्यात आलेली असून सद्य:स्थितीत सामंजस्य कराराची छाननी टि सी एस कंपनीच्या विधी विभागामार्फत सुरु आहे.

गट-ड संवर्गातील सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली ५३ पदे बाहययंत्रणेव्दारे भरण्याचा प्रस्ताव नुकताच संचालनालयाकडून प्राप्त झाला आहे. करार पध्दतीने १ वर्षाकरीता ५२५ कंत्राटी पदे उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्युत वितरण कंपनीच्या देखभाल अभावी वीज हानी होत असल्याबाबत

**(२५) * १९३२२ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंभोरा (खुर्द) (ता.कुही, जि.नागपूर) गावातील विद्युत वितरण कंपनीच्या दुर्लक्षपणामुळे पायाभूत सुविधा, मूलभूत कामे व देखभाल अभावी वीजहानी मोठ्या प्रमाणावर होत असून, विदयुत खांबांच्या खालील झाडांची कटाई करणे, लोंबकळलेल्या विदयुत वाहिन्या व्यवस्थित करणे व मोकळे असलेल्या डी.पी.ला संरक्षण बॉक्स तयार करणे ई.कामे विद्युत वितरण कंपनीची असूनही कंपनीचे अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांना वीजेच्या सुविधेकरीता संघर्ष करावा लागत असताना, विद्युत वितरण कंपनीच्या वीज वितरणप्रणालीच्या सदोष व्यवस्थेमुळे नागरिकांचा जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने आवश्यक त्या सुरक्षात्मक उपाययोजना राबविण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत आवश्यक उपाययोजना करून पायाभूत सुविधा उभारणेबाबत विद्युत वितरण कंपनीला आवश्यक निर्देश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महावितरणद्वारे नेमुन दिलेल्या सूचीबध्द कंत्राटदारामार्फत प्रतिबंधात्मक दुरुस्ती तसेच देखभाल करण्यात येते.
(२) हे खरे नाही.

वीज वितरण प्रणाली सुस्थितीत ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक दुरुस्ती अंतर्गत जीर्ण झालेले पोल अथवा कंडक्टर बदलणे, अर्थिंग संदर्भातील कामे, रोहित्रांची केबल आणि किटकॅट बदलणे इ. कामे कंत्राटदारांमार्फत केली जातात.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाळुंज महानगर (औरगांबाद) औद्योगिक परिसरात नवीन स्वतंत्र न्यायालयाची स्थापना करणेबाबत

**(२६) * १८८२९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाळुंज महानगर (औरगांबाद) येथे स्वतंत्र न्यायालयाची स्थापना करण्याची मागणी मागील १० वर्षांपासून प्रलंबित असल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या समितीने नुकतेच वाळुज औद्योगिक परिसरात नवीन स्वतंत्र न्यायालय स्थापन करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वतंत्र न्यायालय स्थापनेसाठी निर्धारित केलेल्या मापदंडानुसार न्यायालय इमारत, निवासस्थाने, संलग्न कार्यालयासाठी जागा, मूलभुत सुविधा असलेल्या इमारतीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळुंज परिसरात न्यायालय इमारती व निवासस्थानासाठी जागा व त्यावरील बांधकाम करण्यासाठी तसेच आराखडा व मनुष्यबळ निर्मितीस मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १५/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये वाळुंज महानगर (औरगांबाद) येथे न्यायालय व संलग्न कार्यालयाकरीता जागा तसेच न्यायिक अधिकारी यांचेकरीता निवासस्थान या शासकीय मूलभूत सुविधा उपलब्ध होण्याच्या अटीवर दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी हे न्यायालय स्थापन करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे.
(२) होय,हे खरे आहे.
(३) यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती शहरातील नागरिकांचे वीज जोडणींचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(२७)** * **१९४३९ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात राज्याच्या विदयुत विभागामार्फत विदयुत पुरवठा करण्यासाठी भूमिगत विदुयत केबलच्या कामात प्रचंड दिरंगाई होत असल्याने वीज जोडणीसाठीचे अनेक अर्ज प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शहरातील विदयुत पुरवठा करणे तसेच भुमीगत केबलचे काम करण्यात होत असलेली दिरंगाई दूर करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

अमरावती शहरात भुमिगत विद्युत केबलच्या कामाच्या दिरंगाईमुळे कोणतेही नवीन वीज जोडणीचे काम प्रलंबित नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुण्यातील आळंदी येथून ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीचे प्रस्थान होत असताना वारकऱ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याबाबत

**(२८)** * **२०१०६ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरीच्या आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीचे पुण्यातील आळंदी येथून प्रस्थान होत असताना प्रशासनाच्या गैरव्यवस्थापनामुळे मंदिरात प्रवेश करत असताना वारकऱ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याची घटना दिनांक ११ जून, २०२३ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंदिराजवळ लावण्यात आलेल्या बॅरिकेट्सजवळ मोठ्या प्रमाणात वारकरी उपस्थित झाले असता पोलिसांनी अचानक भाविकांवर लाठीचार्ज करुन काही वारकऱ्यांना पोलीसांनी फरफटत नेल्याने वारकऱ्यांत प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माऊलीच्या दिंडी सोहळ्याबाबत प्रशासनाच्या गैरव्यवस्थापनाची उच्चस्तरीय चौकशी करुन लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्याची भाविकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही. संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थानच्या वेळी मानाच्या ४७ दिंडीतील ७५ वारकऱ्यांना पास देण्यात आला. त्यामुळे तेवढेच वारकरी भाविक यांना मंदिरात प्रवेश देण्यात येत असताना मंदिराचे शेजारील रस्त्यावरील ३०० ते ४०० पालखीचे प्रस्थानचे वेळी

मंदिरात उपस्थित रहाण्याची परंपरा नसलेले तरुण वारकरी मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून आग्रह करीत होते. त्यावेळी पोलीस उप आयुक्त, परि.१, तसेच सहायक पोलीस आयुक्त, चाकण विभाग यांनी त्यांना फक्त मानाच्या दिंड्यांना प्रत्येकी ७५ पास देऊन मंदिर प्रवेशचा निर्णय झालेला असल्याचे सांगितले. तरुण वारकरी यांना प्रवेश न दिल्याने त्यांनी सुरक्षेसाठी लावलेले बॅरीकेट्स ढकलून देवून व पोलीसांना खाली पाडून त्यांच्या अंगावरुन आरडाओरड करीत महाद्वाराकडे पळू लागले. पोलीसांनी पुढे जाऊन काठ्या आडव्या लावून त्यांना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. त्यात काही पोलीस अधिकारी व अंमलदार जखमी झाले. त्यांनतर जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यापक यांनी तरुण वारकऱ्यांना समजावून सांगून परत पाठविले व त्यांनी झाल्या प्रकाराबद्दल पोलीस प्रशासनाची माफी मागितली.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र सुरक्षा बलाचे बळकटीकरण करणेबाबत व सुरक्षा दलातील जवानांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(२९) * २०५०८ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील सुरक्षा जवान हे ११ वर्षे कंत्राटी पध्दतीवर आणि तुटपुंज्या वेतनावर काम करीत असून त्यांच्या अन्यायकारक बदल्या, अधिनियमाला डावलून गणवेश व ओळखपत्रामध्ये बदल करणे, आरोग्य विमा नसणे, प्रशिक्षणाची कमतरता इत्यादी समस्यांमुळे सुरक्षारक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात बृहन्मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, चंद्रपूर, नागपूर, सांगली, अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद, कोल्हापूर, रत्नागिरी सिंधुदुर्ग, पुणे अशा १२ जिल्ह्यांतील कार्यालयांसमोर एकाच वेळी निषेध आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढलेल्या महागाईचा विचार करून जाहीर केलेल्या वेतनात लवकरात लवकर बदल करून किमान पाच ते सहा हजार इतकी वेतनवाढ केली नाही तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महासंघाने शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुरक्षा बलाचे बळकटीकरण तसेच सुरक्षारक्षकांचे वेतन वाढ व इतर समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नाही, हे खरे नाही.
(४) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातील सुरक्षाकर्मींच्या वेतनात माहे एप्रिल, २०१९ मध्ये वाढ करण्यात आलेली असून त्यांच्या वेतनात वाढ करण्यासाठी सुरक्षा विषयक सेवा घेणाऱ्या आस्थापनांकडून द्यावयाचे सुरक्षा शुल्कात वाढ करणे आणि त्यानुसार सुरक्षा कर्मींच्या वेतनात वाढ करणे याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृष्णा खोऱ्याचे १६.६६ टीएमसी पाणी मराठवाड्यास उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) * १९३६१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरगांबाद येथे दिनांक २२ फेब्रुवारी, २००५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत तत्कालीन मुख्यमंत्री यांनी कृष्णा खोऱ्याचे २३.६६ टीएमसी पाणी मंजूर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी न करता तत्कालीन शासनाने सन २००७ मध्ये मराठवाड्यासाठी १९ टीएमसी पाणी उपलब्ध असल्याचे नमुद केले यास स्थानिक नेत्यांच्या विरोधामुळे जलसंपदा विभागाने सुधारित आराखडा तयार करुन दिनांक २७ ऑगस्ट, २००९ रोजी २३.६६ टीएमसी पाण्याला मंजुरी दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हे पाणी मंजूर करताना जलसंपदा विभागाने मराठवाड्याला ७ टीएमसीपर्यंतच पाणी देण्याबाबत निर्बंध घातले, परिणामी १८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही मराठवाड्यास कृष्णा खोऱ्याकडून १६.६६ टीएमसी पाणी उपलब्ध होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित १६.६६ टीएमसी पाणी मराठवाड्यास उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय अंशत: खरे आहे.

दिनांक २२ फेब्रुवारी २००५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पास २१.०० अ.घ.फू.पाणी उपलब्ध करण्यास मान्यता देणेबाबत निर्णय झाला. तथापी, तद्नंतर पाण्याच्या उपलब्धतेनुसार कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पास २३.६६ अ.घ.फू.पाणी मंजूर करण्यात आले.
(२) होय अंशत: खरे आहे.

कृष्णा भीमा स्थिरीकरण प्रकल्पाच्या माध्यमातुन उजनी प्रकल्पाच्या जलाशयात सोडावयाच्या ६३ अ.घ.फु. पाण्यापैकी २१ अ.घ.फू. पाणी व सिना कोळेगाव प्रकल्पाच्या खालच्या भागातील सिना नदीतून उपलब्ध होणाऱ्या ४ अ.घ.फू. पाणी, असे एकूण २५ अ.घ.फु. पाण्यापैकी उजनी जलाशयातील १९ अ.घ.फू. पाणी दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजनाद्वारे उस्मानाबाद जिल्ह्यास उपलब्ध करुन देण्यासंदर्भात दिनांक २३/०८/२००७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

तथापि, बीड जिल्ह्यास वरीलप्रमाणे पाणी उपलब्ध करुन देणे जिकरीचे होत असल्याने त्यात अंशत: बदल करुन उस्मानाबाद जिल्ह्यासाठी १५ अ.घ.फू. उजनी जलाशयातून व ४ अ.घ.फू. सिना कोळेगाव प्रकल्पाच्या खालील मुक्त पाणलोट क्षेत्रातून, असे एकूण १९ अ.घ.फू. व बीड जिल्ह्यास ६

अ.घ.फू. उजनी जलाशयातून असे एकूण २५ अ.घ.फू. पाणी देण्याचे ठरले. तथापि, सिना कोळेगाव प्रकल्पाच्या खालील मुक्त पाणलोट क्षेत्रातून उपलब्ध होणाऱ्या ४ अ.घ.फू. पाण्यापैकी प्रत्यक्षात २.६६ अ.घ.फू. पाणी उपलब्ध होत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाची व्याप्ती २५ (२१+४) अ.घ.फू. वरुन २३.६६ (२१+२.६६) अघफु ला मर्यादेत करणे आवश्यक झाले. त्यानुसार कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पास शासन निर्णय दिनांक २७/०८/२००९ अन्वये उसिंयो क्र.३ बीड च्या समावेश करुन सुधारीत प्रशासकीय मान्यता २३.६६ अ.घ.फू. करीता देण्यात आली. परंतु प्रत्यक्ष काम प्रथम टप्प्यातून ७ अ.घ.फू. मर्यादेत करण्याचे सुचीत केले.

(३) होय.

कृष्णा-मराठवाडा प्रकल्पासाठी आवश्यक उर्वरित १६.६६ अ.घ.फू. (२३.६६-७.००) पाणी कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पातून उपलब्ध होणे अपेक्षीत होते. दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार एका उपखोऱ्यातुन दुसऱ्या उपखोऱ्यात पाणी वळविण्यास लवादाने बंदी घातली. त्यामुळे कृष्णा-मराठवाडा प्रकल्पासाठी आवश्यक ते पाणी मिळण्यास अडचण निर्माण झाली.

तथापी शासन पत्र दिनांक ०७/०७/२००९ मध्ये कृष्णा-भीमा प्रकल्पाचे सुधारित जल नियोजनानुसार आंध्र प्रदेशच्या पोलावरम प्रकल्पातून महाराष्ट्रास १४ अ.घ.फू. पाणी अनुज्ञेय झालेले आहे. या १४ अ.घ.फू. पाण्यापैकी दिनांक ०७/०७/२००९ रोजी मा.उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी ७ अ.घ.फू. पाणी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला. त्यानुसार कृष्णा-मराठवाडा प्रकल्पाचे नियोजन व बांधकाम ७ अ.घ.फू.मर्यादेत अंमलबजावणीचा प्रथम टप्पा व उर्वरीत १६.६६ अ.घ.फू. पाणी नविन लवादाच्या निर्णयानंतर उपलब्ध होण्याची शक्यता असल्याने अंमलबजावणीचा द्वितीय टप्पा, असे दोन टप्प्यात नियोजित करण्यात आले.

शासन निर्णय दिनांक २७/८/२००९ अन्वये कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना (२३.६६ अ.घ.फु.) जि.उस्मानाबाद व जि.बीड प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच सदरील सुधारीत प्रशासकीय मान्यतेप्रमाणे एकूण २३.६६ अ.घ.फु.करीता रुपये ४८४५.०५ कोटी रकमेस मान्यता देण्यात येत असली, तरी प्रत्यक्ष प्रथम टप्प्यात उपलब्ध होणाऱ्या७.०० अ.घ.फु. पाण्याच्या मर्यादेत कामे हाती घेण्यात यावीत, असे सूचित केले आहे.

त्यामुळे योजनेची कामे प्रथम टप्प्यात उपलब्ध होणाऱ्या ७.०० अ.घ.फु पाणी वापराच्या मर्यादेत करणे क्रमप्राप्त झालेले असून त्यानुसार सदरील कामे प्रगतिपथावर आहेत.

(४) याबाबत कृष्णा पाणी तंटा लवादाचा निर्णय अधिसूचित झालेनंतर याबाबतचा निर्णय घेणे शक्य होईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागाचा निधी अखर्चित ठेवणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करणेबाबत

**(३१) * १९५८६ श्री.आमश्या पाडवी, श्री.एकनाथराव खडसे, श्री.जयंत पाटील, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-१६ ते सन २०२२-२३ या कालावधीत आदिवासी विकास विभागासाठी सुमारे ७० हजार कोटी रुपये अर्थसंकल्पित करण्यात आले, परंतु प्रत्यक्ष खर्च मात्र ५४ हजार कोटी रुपये इतका झाला असल्याने सुमारे १६ हजार कोटी रुपये हे अखर्चित राहून परत गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाच्या अनेक योजना अस्तित्वात असून सुकथनकर समितीने सुचविल्याप्रमाणे आदिवासी उपाययोजनेच्या नियतव्ययचा मोठा भाग आदिवासी समाजाला प्रत्यक्ष लाभ देणाऱ्या लघु पाटबंधारे, मृद व जल संधारण, ग्रामीण पाणीपुरवठा, माता व बाल आरोग्य इत्यादी योजनांकरीता खर्च करणे अपेक्षित असून सदर योजनांची लाभार्थीसंख्या देखील मोठ्या प्रमाणात असतानाही निधी अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर निधीचा विनियोग न करता शासनास तो परत जाण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर शासन काय कारवाई करणार आहे,
(४) असल्यास, पात्र लाभार्थी असताना देखील त्यांना लाभ न देता सदर निधी अखर्चित राहतो याबाबत चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय,

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागासाठी सन २०१५-१६ ते सन २०२२-२३ या कालावधीत राज्याच्या नियतव्ययातून आदिवासी घटक कार्यक्रमाकरिता रुपये ६५९९९.७९ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता.त्यापैकी रुपये ५८३२७.४० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला होता.यापैकी रुपये ५६१६०.६८ कोटी इतका निधी खर्च झाला असून वितरीत निधीच्या प्रमाणात खर्च ९६.२९ टक्के इतका आहे. सदर वितरित निधीपैकी एकूण रुपये २१६६.७२ कोटी इतका निधी अखर्चित असून त्याचे प्रमाण वितरीत निधीच्या ३.७१ % इतके आहे.
(२) उक्त कालावधीतील निधी अखर्चित राहण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :- (i) प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस योजनांकरीता संबंधित यंत्रणेकडून आलेली मागणी तसेच उपलब्ध नियतव्यय विचारात घेऊन निधी अर्थसंकल्पित करण्यात येतो. तथापि, वर्ष अखेरीस राज्याच्या वित्तीय स्थितीस अनुसरुन अर्थसंकल्पित केलेला निधी वित्त विभागाकडून पूर्णतः विभागास उपलब्ध करुन दिला जात नाही. त्यामुळे अवितरीत निधी अखर्चित दिसून येतो.

(ii) तसेच केंद्र पुरस्कृत योजनांच्या समरुप राज्य हिश्श्याकरिता तरतूद अर्थसंकल्पित करण्यात येते. तथापि, केंद्राचा निधी प्राप्त न झाल्यास असा निधी अखर्चित दिसून येतो.

(iii) मार्च, २०२० पासून महाराष्ट्रत कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला होता.याकरीता उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने खर्चावर सन २०१९-२० च्या वर्ष अखेरीस व सन २०२०-२१ या वर्षात आर्थिक निर्बंध असल्याने निधी खर्च होऊ शकला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या मृत्यूबाबत

**(३२) * १९७७४ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.राजहंस सिंह, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विभागाअंतर्गत एकूण ५४० अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून या आश्रमशाळेत सुमारे २,४२,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील सन २०१७ ते २०२३ या कालावधीत शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे ६८० आणि अनुदानित आश्रमशाळांमध्ये सुमारे ४६४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून आदिवासी अनुदानित आश्रम शाळांना अनेक आजारांचा विळखा पडल्याने मागील पाच वर्षांत श्वसनाचा आजार, मोठ्या आतड्यांचा आजार, सिकलसेल, ॲनिमिया अशा विविध आजारपणांमुळे सुमारे ४६४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वात जास्त २०९ मृत संख्या ही नाशिक विभागात असून मुलांची संख्या १२२ तर मुलींची संख्या ही ८७ इतकी आहे, यातील सर्वाधिक मृत्यू आजारपणामुळे झाल्याने अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात एकूण ५४० अनुदानित आश्रम शाळांमध्ये लाखो मुले मुली शिकत असताना त्यांना देण्यात येणाऱ्या सर्व योजनांचा तातडीने आढावा घेऊन शासन कोणती उपाययोजना करणार आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या आढाव्यानुसार आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी प्रारूप आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुरेशी यंत्रणा उभारण्याबाबत तसेच आश्रमशाळेत राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालकत्व हे संबंधित संस्थेचे व शासनाचे असल्यामुळे अशा मृत्युबाबत संस्थाचालक यांचेवर गुन्हा नोंदवून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात एकूण ५४२ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून सदर शाळांमध्ये एकूण २,४१,८९४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत शासकीय आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी शाळेच्या ताब्यात असताना एकूण ४९ विद्यार्थी विविध आजारपणामुळे मृत्यू पावलेले आहेत.

सन २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत अनुदानित आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी शाळेच्या ताब्यात असताना एकूण ५९ विद्यार्थी विविध आजारपणामुळे मृत्यू पावलेले आहेत.

(३), (४) व (५) अंशत: खरे आहे

नाशिक विभागात आदिवासी संख्येच्या प्रमाणात आश्रमशाळांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तेथील आश्रमशाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्याही त्याप्रमाणात आहे. विभागातील शाळेच्या ताब्यात असताना विविध आजारपणामुळे २८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये मुलांची व मुलींची संख्या अनुक्रमे २० व ८ इतकी आहे.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू रोखण्यासाठी व त्यावर उपायोजना सुचविण्यासाठी डॉ. सुभाष साळुंखे, सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.शाआशा.२०१६/प्र.क्र.१२५/का.१३, दिनांक ३० मे, २०१६ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सुचविलेल्या शिफारशी अनुषंगाने दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये विद्यार्थी मृत्यूबाबत चौकशी करण्याकरीता आपतकालीन आढावा गट, वैद्यकीय सामाजिक आढावा समिती तसेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समित्या आश्रमशाळांना भेटी देतात. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत व इतर सोयीसुविधांबाबत पाहणी करुन शालेय प्रशासनास सूचना देण्यात येतात. विद्यार्थी मृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी विद्यार्थ्यांचे समुपदेशन, आरोग्यसुविधा, प्रथमोपचारपेटी तसेच वैद्यकीयदृष्टीने डॉ. साळुंके समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करणेबाबत सूचना दिल्या जातात.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील प्रवेशित विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यास त्यांना रुपये २.०० लक्ष सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात येते. शासकीय आश्रमशाळेतील मृत विद्यार्थ्यांच्या पालकांना वितरित होणारे रुपये २.०० लक्ष अनुदान आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येते व अनुदानित आश्रमशाळेतील मृत विद्यार्थ्यांच्या पालकास रुपये १.०० लक्ष आदिवासी विकास विभागामार्फत व रुपये १.०० लक्ष संस्थेमार्फत अदा केले जाते. शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याचे शाळेच्या ताब्यात असताना मृत्यू झाल्यास मृत विद्यार्थ्याच्या शवविच्छेदन अहवालानुसार दोषी असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी तसेच संस्था चालक यांना कारणे दाखवा नोटीस बजावून नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतशिवारांमध्ये लोंबकळणाऱ्या वीज वाहक तारा व डीपीच्या दुरुस्तीची कामे सुरक्षिततेच्या दृष्टीने पावसाळ्यापूर्वी करणेबाबत

**(३३) * १९६४६ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतशिवारांमध्ये ६० वर्षांपूर्वीच्या लोंबकळणाऱ्या वीज वाहक जीर्ण तारांचा प्रश्न ऐरणीवर असताना कृषी पंपाच्या वीजपुरवठ्यासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष सुरू असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लोंबकळणाऱ्या तारांमुळे शॉर्ट सर्किट होऊन शेतमालाचे जळून नुकसान होण्याच्या घटनेत वाढ होत असल्याने लोंबकळणाऱ्या तारांवर आलेले वृक्ष तोडणे, शेतशिवारातील उघड्या डीपी फ्युज झाकणे, वाकलेले खांब सरळ करणे इ. कामे पावसाळा सुरू होण्यापूर्वी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) ग्राहकांना उच्च दर्जाची सुविधा उपलब्ध करण्यासाठी महावितरणच्या धोरणानुसार राज्यात महावितरणच्या क्षेत्रामध्ये प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती आणि ब्रेकडाऊन मेंटेनन्स अंतर्गत प्रत्येक स्तरावर महावितरणच्या सुचिबध्द कंत्राटदाराकडून विद्युत तारा बदलणे, झोळ आलेल्या विद्युत तारा ओढणे, जंपर बदलणे, पोल बदलणे, झाडाच्या फांद्या तोडणे, स्टेला व्यवस्थित ताणे बसविणे, रोड क्रॉस गाळयाला गार्डींग व्यवस्थित करणे, डीस्ट्रीब्यूशन बॉक्स दुरुस्ती करणे इ. कामे पावसाळा सुरु होण्यापूर्वी करण्यात येतात. त्यामुळे संभाव्य ब्रेकडाऊन किंवा वारंवार वीज पुरवठा खंडीत होण्याचे तसेच अपघात होण्याचे प्रमाण कमी झाले.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत

**(३४) * १९७९२ ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गेल्या काही महिन्यांपासून गुन्ह्यांची संख्या वाढली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२३ या दोन महिन्यांत १५ हत्या झाल्याचे गुन्हे नोंद आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय

प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीच्या अनुषंगाने दखलपात्र व अदखलपात्र गुन्हा दाखल करुन त्या तक्रारीचे निवारण करण्याबाबत अवलंबिलेल्या धोरणामुळे सन २०२२ च्या तुलनेत सन २०२३ मध्ये गुन्ह्याच्या संख्येत अल्प प्रमाणात वाढ झालेली आहे.
(२) होय.

तथापि, सदरचे गुन्हे वैयक्तिक वादातून व तात्कालीन अचानक उद्भवलेल्या कारणातून झाले आहेत.

(३) ठाणे पोलीस आयुक्तालयात वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याकरीता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

• पोलीस ठाणे हद्दीत दिवस - रात्रौ पिटर मोबाईल, पीसीआर मोबाईल, मोटार सायकल व पायी पेट्रोलींग करण्यात येते.

• रेकॉर्डवरील गुन्हेगारांना वेळोवेळी तपासून क्रियाशिल गुन्हेगारांविरूध्द तसेच तुरुंगातून सुटलेले व जामीनावर सुटलेल्या गुन्हेगारांविरूध्द ठोस प्रतिबंधक कारवाई करण्यात येते.

• जेष्ठ नागरीक, मोहल्ला व शांतता कमिटी, महिला दक्षता समिती, ज्वेलर्स, भंगार दुकानदार, गॅरेजवाले व इतर यांच्या जनजागृतीसाठी वेळोवेळी मिटींग घेण्यात येतात.

• सराईत आरोपींविरुध्द जरब बसविण्याच्या अनुषंगाने सन २०२३ मध्ये मोक्का अंतर्गत- ३० एमपीडीए अंतर्गत- २० महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये तडीपार कारवाई - २०६ व फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई-८९२ एवढ्या आरोपीविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या आहेत.

• गुन्हयात अटक आरोपीतांविरूध्द जास्तीत जास्त पुरावा गोळा करून विहित वेळेत दोषारोपपत्र सादर करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर शहरातील (जि.ठाणे) महालक्ष्मी नर्सिंग होममधील नवजात अभ्रकाची विक्री करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(३५) * १९०२४ श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालक्ष्मी नर्सिंग होम, उल्हासनगर (जि.ठाणे) येथे एका लहान बाळाची विक्री होत असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाला मिळाल्याने दिनांक १७ मे, २०२३ रोजी दुपारी ३.०० च्या सुमारास छापा टाकूण अवघ्या २२ दिवसांच्या बाळाची ७ लाख रूपयात विक्री करण्यात येत असल्याचा प्रकार निदर्शनास आला असून गुन्हे अन्वेषण विभागाने याप्रकरणी ५ जणांना अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अटक केलेल्या आरोपीमध्ये महालक्ष्मी नर्सिंग होम मधील डॉ. चित्रा चेनानी यांच्या माध्यमातून नवजात बाळाची खरेदी-विक्री करण्यात आल्यामुळे त्यांना यापूर्वीही ठाणे पोलीसांनी अटक केली होती, जामिनावर सुटल्यानंतर त्यांनी पुन्हा हा प्रकार केल्याचे निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगरमधील बाळ विक्रीचा संबंध नाशिक, बेळगाव येथील प्रकरणांशी असल्याचेही पोलीसांच्या प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले असून महालक्ष्मी नर्सिंग होमचा नवजात अभ्रक विक्री करण्याचा धंदा असल्याचा संशय पोलीसांना आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवजात अभ्रकांची विक्री करणाऱ्या टोळीकडून आजमितीस किती बाळाची विक्री करण्यात आली आहे तसेच बंद असलेले महालक्ष्मी नर्सिंग होम पुन्हा सुरु करणाऱ्या डॉक्टरसह इतर संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) महालक्ष्मी नर्सिंग होम मधील आरोपी डॉ. चित्रा चैनानी यांना यापूर्वी नवजात बाळाच्या खरेदी-विक्री आरोपाखाली अटक करण्यात आली नव्हती. तथापि, अन्य आरोपाखाली अटक करण्यात आली होती.

(३) हे खरे नाही.

(४) सदर घटनेबाबत मध्यवर्ती पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.नं. ३२८/२०२३ भा.दं.वि. कलम ३७०, ३४, १२० (ब) सह बालन्याय (बालकांची काळजी व संरक्षण) २०१५ चे कलम ८०, ८१ प्रमाणे दिनांक १७/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ०५ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेविरूध्द मा.न्यायालयात दिनांक ३०/०६/२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच सदरचे नर्सिंग होम अद्याप बंद आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षांवरून ६० वर्षे करण्याबाबत

**(३६) * १८९४२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षांवरून ६० वर्षे करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मागणीच्या अनुषंगाने राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षांवरून ६० वर्षे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) उक्त मागणीबाबत अद्याप शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## नागपूर येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने झोपडपट्टी सक्षमीकरणातंर्गत नागरिकांमध्ये कायदेविषयक जनजागृती करून आवश्यक कागदपत्रे मिळवून देण्याबाबत

**(३७) * १९०६७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने झोपडपट्टी सक्षमीकरणातंर्गत नागरी कामामध्ये कायदेविषयक जनजागृती करणे आणि त्यांना जन्मदाखला आणि इतर आवश्यक कागदपत्रे मिळवून देण्याकरीता योजना सुरू करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपराजधानीमध्ये ४६० झोपडपट्ट्या असून स्वातंत्र्याच्या महोत्सवी वर्षामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने या सर्व ठिकाणी हा कार्यक्रम राबविला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने या योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता लागणारे मनुष्यबळ आणि इतर सर्व खर्च याची प्रतिपूर्ती विधी व न्याय विभागाने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर येथील झोपडपट्ट्यांमधील बऱ्याच लोकांकडे प्राथमिक दस्तऐवज जसे की जन्म मृत्यूचा दाखला, इत्यादी नसल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हा विधि सेवा प्राधिकरण नागपूर यांच्यामार्फत झोपडपट्ट्यांमध्ये कायदेविषयक जनजागृती व झोपडपट्टीतील लोकांना आवश्यक कागदपत्र मिळविण्यासाठी मदत करणे हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पात्र रहिवाश्यांना जन्म मृत्यूचा दाखला मिळविण्यासाठी आवश्यकता पडल्यास न्यायालयात प्रकरण दाखल करण्यासाठी वकीलांची सेवा विनामुल्य पुरविण्यात येणार आहे.
(२) नागपूर जिल्हा विधि सेवा प्राधिकरणामार्फत जेवढ्या झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन जनजागृती कार्यक्रम शक्य होईल तेवढ्या जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याकरीता जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.
(३) जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, नागपूरच्या पॅनलवर जवळपास ७६ विधिज्ञ व १०० विधि स्वयंसेवक असून त्यांचे सहाय्याने हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमांसाठी राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरणामार्फत देण्यात येणाऱ्या निधीमधून मानधन व इतर खर्च करण्यात येतो. या संदर्भात मनुष्यबळाची तरतूद व इतर सर्व खर्च याच्या प्रतिपुर्तीची कारवाई विधि व न्याय विभागातर्फे केली जात नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भराड (ता.डहाणू) येथील सुर्या कालव्याच्या जलसेतूची दुरुस्ती करण्याबाबत.

**(३८) * २००२० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भराड (ता.डहाणू) येथील सुर्या कालव्याचा जलसेतू १५ वर्षापूर्वी कोसळला असून अद्यापही त्याची दुरुस्ती झाली नसल्याची बाब दिनांक २३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कोसळलेल्या जलसेतूस लोखंडी सळईचा आधार देवून तात्पुरत्या जोडण्यात आलेल्या पाईपलाईनमधून मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत असल्याने परिसरातील गावांतील शेतीला अपुरा पाणीपुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कोसळलेल्या जलसेतूची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि सदरहू ठिकाणी कोसळलेल्या जलसेतूच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्याबाबत तसेच दुरुस्तीच्या कामास विलंब लावणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

तथापि, भराड, ता.डहाणू येथील सुर्या उजवा तीर कालव्यावरील वितरिका क्र.१ च्या साखळी क्र.३९४० मी. वरील सन २००९ मध्ये कोसळलेल्या जलसेतूची सन २०११ मध्ये तात्पुरत्या स्वरूपात दुरूस्ती करण्यात आली असून सन २०१९-२० मध्ये सदर जलसेतूची पुनश्च दुरूस्ती करण्यात आली आहे.

(२) नाही,

सद्य:स्थितीत दुरूस्तीनंतर सदर जलसेतू सुस्थितीत असून त्यातून पाण्याची गळती नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चासकमान (ता.खेड, जि.पुणे) डावा कालव्यासाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(३९) * १८९०२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चासकमान (ता.खेड, जि.पुणे) डावा कालव्यासाठी १९९५ साली संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना आजतागायत दिलेला नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोबदला न दिल्याने चालू बाजारभावानुसार तातडीने मोबदला मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी मा.जलसंपदा तथा उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.महसूल मंत्री, मुख्य अभियंता, जलसंपदा, कार्यकारी अभियंता, चासकमान प्रकल्प यांच्याकडे दिनांक २४ एप्रिल,२०२३ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चासकमान (ता.खेड, जि.पुणे) डावा कालव्यासाठी १९९५ साली संपादित केलेल्या जमिनीचा चालू बाजारभावाप्रमाणे मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

चासकमान डावा कालव्यासाठी सन १९९५ साली संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला संबंधित बाधित शेतकऱ्यांना अदा करण्यात आला आहे, तथापि, चासकमान डावा कालव्यासाठी सन १९९५ साली मौजे साबळेवाडी/बहूळ येथील चासकमान डावा कालवा सा.क्र.६१/३५० येथून निघणारी वितरिका क्र.१० मधुन निघणारी सिध्देगव्हाण मायनर (मुख्य) व तिची उपचारी क्र.१ व २ कामासाठी संपादनाची कार्यवाही प्रगतीत असलेल्या जमिनीं संबंधित शेतकऱ्यांकडून सन १९९५ साली कब्जे पावत्या/ ताबे पावत्या करुन जमिनींचा ताबा सन १९९५ साली चासकमान प्रकल्पासाठी घेण्यात आला. सदर भूसंपादनाची कार्यवाही भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये विशेष भुसंपादन अधिकारी क्र. ११ यांचे कार्यालयामार्फत एसआर.क्र ४२/२००१ नुसार प्रगतीत होती. भूसंपादन कार्यवाही प्रगतित असताना नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ पासून लागू झाल्यामुळे सदर भुसंपादन प्रस्ताव सद्य:स्थितीत संयुक्त मोजणी होउन व्यपगत झालेला आहे.

चासकमान प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रशासकीय अहवालानुसार मौजे साबळेवाडी/बहूळ येथील चासकमान डावा कालवा सा.क्र.६१/३५० येथून निघणारी वितरिका क्र.१० मधुन निघणारी सिध्देगव्हाण मायनर (मुख्य) व तिची उपचारी क्र.१ व २ करीता नवीन शासन धोरण शासन निर्णय दिनांक ०९/०६/२०१६ नुसार बंदिस्त नलिका वितरण प्रणाली (PDN) प्रस्तावित करण्यात आली असल्यामुळे त्याअनुषंगाने तृतीय प्रशासकीय मान्यतेच्या अहवालावर शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे. सदर तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या पश्चात ज्या क्षेत्रामध्ये बंदिस्त नलिका वितरण प्रणाली प्रस्तावित करण्यात आली आहे, त्या क्षेत्राकरीता शासकीय नियमानुसार भूभाडे बाबतच्या प्रस्तावास मंजूरी देऊन बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची भुभाडे रक्कम, निधी उपलब्धतेनुसार अदा करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या घरांसाठीच्या उत्पन्नमर्यादेतील बदलामुळे गृहकर्ज मिळण्यास अडचणी येत असल्याबाबत

**(४०) * १९८५६ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडा घरांसाठी उत्पन्न मर्यादेत नुकताच बदल करण्यात आला असून, अत्यल्प उत्पन्न गटासाठी वार्षिक उत्पन्नाची अट ६ लाख, अल्प उत्पन्न गटासाठी वार्षिक उत्पन्न ९ लाख तर मध्यम उत्पन्न गटासाठी वार्षिक उत्पन्नाची अट १२ लाख अशी निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास अल्प उत्पन्न गटासाठी परवडणारे घर १.५ कोटी आणि उत्पन्न मर्यादा वार्षिक ९ लाख एवढी आहे. त्यामुळे घरांच्या किंमती आणि वार्षिक उत्पन्न यांच्यातील मोठ्या तफावतीमुळे इच्छुकांना गृहकर्ज मिळणे अडचणीचे ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हाडाच्या उत्पन्नाच्या व्याख्येनुसार अल्प गटात मोडणारा उमेदवार मध्यम गटात मोडला जाऊन इतर उत्पन्न गटातही बदल होणार आहे त्यामुळे गट बदलत असल्याने घरे न परवडण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय?
(४) असल्यास, उत्पन्न गटातील आणि उत्पन्नाच्या व्याख्येतील संभ्रम दुर करुन इच्छुकांना घरे मिळुन गृहकर्ज उपलब्ध होण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.अतुल सावे :** (१) होय.
(२), (३) व (४) मुंबई मंडळाच्या सोडती व्यतिरिक्त इतर मंडळाद्वारे राबविण्यात आलेल्या सोडतीमध्ये अल्प उत्पन्न गटासाठी रुपये १.५ कोटी किंमत असलेल्या सदनिकांचा समावेश नाही. तथापि, मुंबई मंडळाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या सोडतीमधील अल्प उत्पन्न गटातील सदनिकेची विक्री किंमत किमान ४५ लाख ते कमाल १.६२ कोटी इतकी निश्चित करण्यात आलेली आहे.
मुंबई मंडळाद्वारे राबविण्यात येत असलेल्या सोडतीमध्ये अल्प उत्पन्न गटातील प्रवर्गासाठी अर्ज प्राप्त झाले आहेत. LIG & MIG अर्जदारांना दोन गटातील सदनिकांसाठी अर्ज दाखल करण्याची संधी प्राप्त झाली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणाकरीता देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीबाबत

**(४१) * १९९६५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती उपलब्ध करून देण्याची योजना आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन परदेशी शिक्षण घेणारे विद्यार्थी एखाद्या सेमिस्टरमध्ये नापास झाल्यास नियमानुसार त्यांना शिष्यवृत्ती दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत काही वर्षांच्या कालावधीत वरील शिष्यवृत्तीच्या आधारे परदेशी शिक्षण घेणारे विद्यार्थी हे संबंधित सेमिस्टर परिक्षेत नापास झाले तरी त्यांना शासनाकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती विशेष व अपवादात्मक बाब म्हणून दिली जात असल्याने, अनुसूचित जमातीमधील पात्र विद्यार्थी परदेशी उच्च शिक्षणापासून वंचित राहत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन जे विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रमाच्या परिक्षेत नापास झाले आहेत त्यांना शिष्यवृत्ती न देता सदरहू शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक ३१/०३/२००५ च्या शासन निर्णयान्वये शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांस परदेशातील निवास, अभ्यासक्रमाच्या कालावधीच्या पलीकडे वाढविता येणार अशी तरतूद आहे. तसेच दिनांक १६ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये परदेशी शिष्यवृत्तीमध्ये जादा निधी मंजूर करता येणार नाही. अशी तरतूद असल्याने सेमिस्टर परीक्षेत नापास विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती विशेष व अपवादात्मक बाब म्हणून देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्याच्या जिल्हा विकास निधीमधून शेतकऱ्यांना विजपुरवठ्यासाठी ट्रान्सफॉर्मर बसवण्यासाठीचा निधी अखर्चित ठेवलेल्या महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४२) * २०५८३ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन २०२१ ते २०२३ पर्यंतच्या कालावधीतील जिल्हा विकास निधी मधून ठिकठिकाणी ट्रान्सफॉर्मर्स बसविण्यासाठी मंजूर केलेला निधी खर्च झालेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रान्सफॉर्मर न बसविल्याने शेतकऱ्यांना विजपुरवठ्यामध्ये अडचणी येऊन शेती पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा विकास निधी मधील ट्रांसफार्मर्स बसविण्याचा निधी अखर्चित ठेवणाऱ्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता आणि संबंधित सर्व अधिकारी यांची चौकशी करून दोषींवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी निधी अखर्चित ठेवणाऱ्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता आणि संबंधित सर्व अधिकारी यांची चौकशी करून दोषींवर तात्काळ सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०२१ ते २०२२ विविध कामांसाठी रुपये १८.३० कोटी इतका निधी प्राप्त झाला. सदर निधीअंतर्गत अतिरिक्त रोहित्र-३१८, लिंकलाईन-०७ कि.मी., वाहिनी स्थानांतरीत करणे-३६ कि.मी., रोहित्र क्षमतावाढ-११ इतकी कामे पूर्ण करण्यात आली. तसेच, सन २०२२-२३ मध्ये दिनांक १२/०५/२०२३ रोजी रुपये १९.६९ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून त्यातील मंजूर कामांची निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक १८/०६/२०२३ रोजी केलेली तक्रार उस्मानाबाद मंडल कार्यालयास दिनांक २०/०६/२०२३ रोजी प्राप्त झाली आहे.
(४) स्थानिक लोकप्रतिनिधीनी तक्रार केलेल्या वेळी सन २०२१-२२ च्या एकूण रुपये १८.३० कोटी प्राप्त निधीमधून एकूण रुपये १६.१४ कोटी इतक्या रकमेची कामे पूर्ण झाली होती. तसेच सन २०२२-२३ मध्ये दिनांक १२/०५/२०२३ रोजी रुपये १९.६९ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून त्यातील मंजूर कामांची निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला सहायता कक्ष सुरु करण्याबाबत

**(४३) * १९५१९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा भाईंदर (जि.ठाणे) येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी सहा पोलीस ठाण्यात महिला सहायता कक्ष उभारण्यात आले असून त्या धर्तीवर मीरा भाईंदर पोलीस आयुक्तालयातील इतर पोलीस ठाण्यात महिला सहायता कक्ष नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला सहायता कक्ष नसल्याने तक्रारदार महिलांना पुरुष ठाणे अंमलदार व पुरुष अधिकारी यांना भेटून अडचण सांगावी लागते त्यातही तक्रारीसाठी येणाऱ्या महिलांना त्यांचे म्हणणे समजून न घेता ताटकळत थांबविले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन पोलीस आयुक्तांनी प्रत्येक पोलीस ठाण्यात महिलांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी महिला सहायता कक्ष उभारण्याचे निदेश दिलेले असतानाही त्याची अंमलबजावणी न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या अनुषंगाने राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात महिला सहायता कक्ष सुरु करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयामध्ये महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी व त्यांच्या तक्रारींचे निरसन व्हावे याकरीता सर्व पोलीस ठाण्यामध्ये महिला सहायता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.तसेच भायंदर व वसई या विभागांत भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे.

(२) मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला सहायता कक्ष असल्याने महिलांची तक्रार महिला पोलीस अधिकारी/अंमलदार घेत असतात

(३) मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला सहायता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

(४) राज्यात डिसेंबर- २०२२ अखेर ११४५ महिला सहायता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. केंद्र शासनाने महिला सहायता कक्ष योजनेच्या अनुषंगाने नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरो (NCRB) या संस्थेला सेंट्रल नोडल एजन्सी म्हणून जाहीर केले आहे.दिनांक १३ फेब्रुवारी,२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेची समन्वय अंमलबजावणी एजन्सी म्हणून विशेष पोलीस महानिरीक्षक,महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) येथील टिटवाळा-खडवली दरम्यानच्या काळू नदीच्या पुलाखालून पाण्याचा उपसा करणाऱ्या टँकरमाफियांवर कारवाई करण्याबाबत

**(४४) * १९१२० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील टिटवाळा-खडवली दरम्यान असलेल्या काळू नदीच्या पुलाखालील दररोज लाखो लिटर पाणी टँकरमाफिया उपसा करीत असल्याची बाब दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कारवाई करण्याबाबत स्थानिक पाटबंधारे विभाग दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा प्रकाराला अटकाव व निर्बंध घालण्याबाबत तसेच पाण्याचा उपसा करणाऱ्या टँकर माफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

ही बाब दिनांक १०/०४/२०२३ च्या दरम्यान निदर्शनास आली.

(२) नाही. हे खरे नाही.
(३) टिटवाळा व खडवली दरम्यानच्या पुलाच्या खाली टिटवाळा को. प. बंधाऱ्यानजीक काही वेळा अनधिकृत पाणी उपसा सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब निदर्शनास येताच विभागाने काही टँकर वाहतूकदारांकडून दंडात्मक वसुली केली आहे व टँकरद्वारे अनधिकृत पाणी उपसा करणाऱ्यांवर आवश्यक कारवाई करण्याबाबत पोलीस निरीक्षक, टिटवाळा यांना कळविण्यात आले आहे. तसेच टिटवाळा बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूस अडथळे बसवून वाहतुकीस प्रतिबंध केला आहे. सद्य:स्थितीत या बंधाऱ्यातून अनधिकृत पाणी उपसा पूर्णपणे बंद आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बारामती (जि.पुणे) येथे बावीस वर्षीय तरुणीचा विनयभंग केल्याबाबत

**(४५) * १८८०८ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बारामती (जि.पुणे) शहरात सहयोग निवासस्थानाच्या गेट समोर एका बावीस वर्षे वयाच्या तरुणीचा विनयभंग करुन, हात ओढून बंगल्याच्या गेटच्या बाहेर नेऊन लग्न करण्यासाठी पळवून नेण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक ६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित आरोपीवर कारवाई करण्याबाबत तसेच अश्या प्रकारच्या वाढत्या घटना रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय,हे खरे आहे.
(२) आरोपीविरुध्द बारामती शहर पोलीस ठाणे येथे दिनांक ०६/०५/२०२३ रोजी, गु. र. नं. २८१/२०२३, भारतीय दंड विधान संहिता कलम ३६३, ३०८, ३५४, ३५४ ड, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच दिवशी अटक करण्यात आली आहे. आरोपीस मा.न्यायालयाने ०३ दिवस पोलीस कोठडी आणि ०३ दिवस न्यायालयीन कोठडी ठोठावली असून दिनांक १२/०५/२०२३ रोजी आरोपीस जामीन मंजूर करण्यात आला आहे. आरोपीवर फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

महिला, मुली यांच्याबाबतच्या अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध करणे याकरीता निर्भया पथक गठीत करण्यात आले असून निर्भया पथकाकडून गस्त घालण्यात येत आहे. तसेच, पोलीस स्टेशन मधील

पोलीस कर्मचाऱ्यांकडून घालण्यात येणाऱ्या गस्त वाढविण्याबाबत पोलीस स्टेशन प्रभारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात खाजगी आस्थापना मध्ये / जागेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरांमध्ये झालेले चित्रीकरण बाहेर व्हायरल होत असल्याबाबत

**(४६) * १९८८५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सीसीटीव्ही कॅमेरांमध्ये चित्रित झालेले चित्रीकरण बाहेर सोशल मीडियातून व्हायरल होत असल्याने गोपनीयतेच्या अधिकार (right of privacy) भंग होत असून यातून मानहानी करण्याचे प्रकार वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी आस्थापनांमध्ये/ जागेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याबाबतची तसेच सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये चित्रित झालेले चित्रीकरण कुणाला दाखविले गेले पाहिजे याबद्दलची काही मार्गदर्शक नियमावली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी आस्थापना मध्ये/जागेमध्ये होणाऱ्या चित्रीकरणाचे समाज माध्यमातून होणारे मानहानी प्रकार रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) राज्यात खाजगी आस्थापना मध्ये / जागेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये चित्रित झालेले चित्रीकरण बाहेर व्हायरल होत असल्याबाबत अशी तक्रार राज्य पोलिसांकडे प्राप्त झाल्याचे दिसुन आले नाही, त्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिलाली (ता.अमळनेर,जि.जळगाव) येथील बोरी नदीवरील साठवण बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

**(४७) * १९२८८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिलाली (ता.अमळनेर,जि.जळगाव) येथील बोरी नदीवरील साठवण बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत असून भिलाली साठवण बंधाऱ्याची चौकशी करण्याची तक्रार उपोषणास बसलेल्या ग्रामस्थांनी दिनांक २ मे २०२३ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भिलाली (ता.अमळनेर,जि.जळगाव) येथील बोरी नदीवर होत असलेल्या साठवण बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत असून भिलाली साठवण बंधाऱ्याच्या कामाची चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) उपोषणास बसलेल्या ग्रामस्थांकडून तक्रार प्राप्त आहे.
(२) सदरचे काम मंजूर संकल्पचित्र व करारनाम्यात नमूद निविदिष्ट मानके/ तरतूदी नूसार प्रगतीत आहे. उपोषणात समाविष्ट ग्रामस्थांच्या शंकांचे निरसण केल्याने उपोषण मागे घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्ह्यातील कार प्रकल्पासह इतर प्रकल्पांतील अपूर्ण कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) * १९३२४ श्री.चंद्रशेखर बावनकुळे : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १४५१४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारी सावंगा (जि.नागपूर) येथील कार नदी प्रकल्पावरील सेतुचे काम अपूर्ण असून, कालवा स्वच्छ करणे व इतर कामे प्रलंबित असल्याने तसेच जाम प्रकल्पातील कालव्याच्या दुरूस्तीची कामे, रस्ता दुरूस्तीची कामे, शेवटच्या टोकापर्यंत पाणी अद्यापही न पोहचणे तथा चिखली प्रकल्पाचे पाणी कॅनल अपूर्ण असून द्वितीय प्रशासकीय मंजुरीचा प्रस्ताव प्रलंबित असून कोच्छी प्रकल्पाची अपूर्ण असलेली सर्व कामे निधी अभावी प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थडीपवनी उपसा सिंचन प्रकल्पाला अद्यापही प्रशासकीय मंजुरी न मिळाल्यामुळे व पिंपळगांव वखाजी कालव्याची कामे अपूर्ण असून तसेच नरखेड तालुक्यातील आवश्यक बंधाऱ्यांची कामे निधी अभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपूर्ण असलेली कामे तातडीने पूर्ण करून व आवश्यक दुरूस्ती तथा प्रस्तावित प्रकल्पांना प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
लोहारी सावंगा, जि.नागपूर येथील कार नदी प्रकल्पाअंतर्गत लोहारी सावंगा वितरीकेवरील जलसेतुचे काम पूर्ण झाले आहे.
जाम प्रकल्प :- जाम प्रकल्पावरील अतिआवश्यक दुरुस्तीची कामे बिगर सिंचन अंतर्गत करण्यात आली असून जामनदी प्रकल्पाअंतर्गत कालवे दुरुस्ती व रस्ता दुरुस्तीची कामे पाखरण २०२३-२४ च्या पाखरण कार्यक्रमात अंतर्भुत करण्यात येत आहे. जाम नदी प्रकल्पाच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहचविण्याकरीता अस्तित्वात असलेल्या कालवा प्रणालीची दुरुस्तीची कामे करण्याकरीता विशेष दुरूस्तीचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून क्षेत्रिय स्तरावर तपासणी अंतर्गत आहे.
चिखली प्रकल्प :- चिखली प्रकल्पाचा लघु कालवा क्र. १० वरील नागपूर - दिल्ली रेल्वेलाईन पुढील कालव्याचे बांधकाम अपूर्ण असून या व इतर बांधकामांचा समावेश करुन प्रकल्पाच्या व्दितीय सुप्रमा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, सदर प्रकल्पाचा व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्तावाबाबत कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

कोच्छी प्रकल्प :- कन्हान नदी प्रकल्प (कोच्छी बॅरेज) अंतर्गत बॅरेजचे स्थापत्य कामे ९०% पूर्ण झालेले असून द्वारे उभारणीचे कामे ऑक्टोबर, २०२३ अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०२३-२४ साठी रुपये ५० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

(२) थडीपवनी उपसा सिंचन योजना प्रकल्प हा उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्रात येत असून या क्षेत्रात नविन योजनेकरीता पाणी उपलब्ध नसल्यामुळे प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणे शक्य नाही.

पिंपळगाव वखाजी प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून कालव्यांचे काही बांधकामांना तातडीने दुरुस्ती करणेसाठी सन २०२३-२४ च्या बिगर सिंचन प्रापणसुची मधे तरतुद करण्यात येत आहे.

नरखेड तालुक्यातील भिष्णुर, इंदरवाडा, खरबडी, खैरगाव, तारा उतारा व सावनेर तालुक्यातील भागीमाहरी कोल्हापुरी बंधारा इत्यादी अशा एकूण ११ बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी सन २०२३-२४ च्या बिगर सिंचन प्रापणसुची मधे तरतुद करण्यात येत आहे.

जलसंधारण विभागांतर्गत नरखेड तालुक्यामध्ये एकूण ३९ कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यातील ३० कामे प्रगतीपथावर असून उर्वरित ९ कामांना स्थगिती आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) येथील शास्त्रीनगर म्युनिसिपल व्यापारी सेवा संघ आणि परिश्रम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासात मोक्याचा प्लॉट बळकाविण्यासाठी दबाव टाकण्यात येत असलेबाबत

**(४९) * १९६८४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) येथील शास्त्रीनगर म्युनिसिपल व्यापारी सेवा संघ आणि परिश्रम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासात मोक्याचा प्लॉट बळकाविण्यासाठी राजकीय पक्षाच्या स्थानिक गुंडांकडून मोठ्या प्रमाणात दबाव टाकण्यात येत असल्याची बाब दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रकरणात संबंधित असलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एचडीएफसी बँकेची बनावट पावत्यांद्वारे फसवणूक करणाऱ्या कंपन्या आणि त्यांच्या संचालकांविरोधात कारवाई करण्याबाबत

**(५०) * १९०१३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एचडीएफसी बँकेची बनावट पावत्या सादर करून २१ कोटी ८२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन कंपन्या आणि त्यांच्या संचालकांविरोधात मुंबईतील ओशिवरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने गुन्हयात सहभागी असलेल्या २ कंपन्या तसेच संचालकांविराधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, सदर गुन्ह्यात सहभागी असलेल्या दोन कंपन्या, दोन संचालक व अन्य एक अनोळखी इसम असा एकूण पाच जणांविरोधात दिनांक ११/०४/२०२३ रोजी ओशिवरा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ३२३/२०२३ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे वर्ग करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर (जि.पालघर) पोलीस कर्मचारी वसाहतीतील निवासस्थानांची दुरवस्था झाल्याबाबत

**(५१) * २०५६९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १५१९७ ला दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर (जि.पालघर) पोलीस कर्मचारी वसाहतीतील निवासस्थानांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या बांधकामाचा प्रस्ताव अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब दिनांक १५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने येथील पोलीस कर्मचाऱ्यांची निवासस्थानाअभावी होत असलेली गैरसोय लक्षात घेता या प्रस्तावाला मंजूरी व निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रमाने बांधकामाची कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळ मर्या.मार्फत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व ४६ प्रशासकीय इमारत आणि ३०५ सेवा निवासस्थान बांधकामाच्या प्राधान्यक्रमाची यादी पोलीस महासंचालकांना पुढील कार्यवाहीसाठी शासनमान्यतेने पाठविण्यात आली आहे. त्यामध्ये पालघर घटकातील विविध पोलीस स्टेशन येथील पोलीस निवासस्थानाच्या बांधकामाचे अनुषंगाने निधी उपलब्धतेनुसार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांचेकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील वेंगणूर, सुरगाव, आळंगेपल्ली व पडकाटोला या गावांमधील आदिवासी नागरिकांना विविध मूलभूत सुविधा देण्याबाबत

**(५२) * २०५३२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेंगणूर, सुरगाव,आळंगेपल्ली व पडकाटोला (जि.गडचिरोली) या गावांमधील आदिवासी नागरिकांनी त्यांना विविध मूलभूत सुविधा मिळत नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाला पत्र लिहून कळविल्यामुळे न्यायालयाने या संदर्भात स्वतःच जनहित याचिका दाखल करून घेतली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माडिया गोंड (जि.गडचिरोली) ही जमात नामशेष होत असल्याने त्यांना विविध मूलभूत सुविधा देण्याबाबत तसेच त्यांच्या विकासाकरीता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे, याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने केंद्र व राज्य सरकारला दिनांक १४ जून, २०२३ पर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश माहे मे, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील वेंगणूर, सुरगाव, आळंगेपल्ली व पडकाटोला या चार गावांमधील आदिवासी नागरिकांना विविध मूलभूत सुविधा देण्याबाबत तसेच त्यांच्या विकासाकरीता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) १ व (२) हो, हे खरे आहे.
(३) सदर गावातील रहिवाश्यांकरीता घरकुल, शिलाई मशिन, संगणक प्रशिक्षण, शेती अवजारे, ताडपत्री पुरवठा यासारखे लाभ देण्यात आले आहेत.

याशिवाय सार्वजनिक विहीर, शाळेला संरक्षक भिंत, समाज मंदिर, सिमेंट कॉक्रिंट रस्ते यासारख्या सार्वजनिक सुविधांचा लाभ देण्यात आलेला आहे.

सदर गावांमध्ये आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता प्राथमिक आरोग्य उपकेंद्र उभारण्यास मान्यता मिळाली असून उपकेंद्र उभारणीचे कामकाज प्रगतीपथावर आहे. सद्य:स्थितीत विद्युत पुरवठा आहे.

सदर गावांना जोडणारे रस्ते बॅकवाटरने प्रभावित होत असल्याने तात्पुरत्या स्वरुपात चार बोट उपलब्ध करुन दिल्या आहेत. तर फेरी बोटीकरीता रुपये १००.०० लक्ष इतका निधी मंजूर असून त्याच्या खरेदीकरीता आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

पर्यायी रस्त्याकरीता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रुपये ७९७.७९ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देणेत आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील रेमंड वुलन मिल (लि.), जे.के.ग्राम व जे.के.इन्व्हेस्टो ट्रेड (इंडिया) लि. या गिरणीतील कामगारांना सवलतीच्या दरात घरे देणेबाबत

**(५३) * १९१३३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचपाखाडी, ठाणे येथील रेमंड वुलन मिल (लि.), जे.के.ग्राम व जे.के.इन्व्हेस्टो ट्रेड (इंडिया) लि. या कंपनींना १२५ एकर शासकीय भूखंड क्षेत्र नागरी जमीन धारणा अधिनियम, १९७६ कलम २० अन्वये औद्योगिक प्रयोजनासाठी सूट देण्यात आलेल्या भूखंडाच्या जमिनीवर आय.टू.आर. (Industrial to Residitional) कायद्यानुसार गृह संकुलाचे नकाशे ठाणे महानगरपालिका व शासन आदेशाप्रमाणे मंजूर करुन त्यावर मोठ्या प्रमाणावर गृहसंकुल उभे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गृहसंकुलाचे नकाशे मंजूर करताना (आय.टू.आर) (Industrial to Residitional) कायदेअंतर्गत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बांधकाम २० टक्के सदनिका शासनाला देणे मान्य केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे मुंबईतील गिरणी कामगारांच्या धर्तीवर या मिल्समधील कामगारांना शासनाने सवलतीच्या दरात सदर सदनिका देणेबाबत निर्णय घ्यावा, यासाठी येथील वर्षानुवर्षे काम करणाऱ्या व सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या पाल्यांची मागणी असून त्यांनी या संदर्भात दिनांक ९ मे, २०२३ रोजी, मा.मुख्यमंत्री, कार्यालय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांना विनंतीपत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने
पाचपाखाडी, ठाणे येथील रेमंड वुलन मिल (लि.), जे.के.ग्राम व जे.के.इन्व्हेस्टो ट्रेड (इंडिया) लि. या गिरणीतील कामगारांना मुंबईतील गिरणी कामगारांच्या धर्तीवर सवलतीच्या दरात सदनिका देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) पाचपाखाडी, ठाणे येथील रेमंड वुलन मिल (लि.), जे.के. ग्राम, जि.ठाणे या कंपनीच्या एकूण ४०२२०४.०३ चौ.मि. मंजूर अभिन्यासापैकी १०५०० चौ.मि. भोगवटादार वर्ग -२ मधील जमीन असल्याने ते क्षेत्र वगळून उर्वरित ३९१७०४.०३ चौ.मि. क्षेत्रापैकी काही भागावर ठाणे महानगरपालिकेने लेआऊट आराखडे मंजूर केले आहे.

जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक २५/०४/२०२३ च्या परवानगी नुसार ठाणे महानगरपालिकेने

मंजूर लेआऊट आराखड्यातील उप भूखंड A, B व C वर इमारत बांधकाम आराखडे मंजूर केलेले आहेत.

तसेच सदर प्रस्तावा अंतर्गत विकास आराखड्यानुसार रहिवास विभागामध्ये असणाऱ्या भूखंडाच्या ३/०८/२ बी नुसार मूळ चटई क्षेत्राच्या २०% क्षेत्र आर्थिक दुर्बल घटकासाठी (EWS) ३६८ सदनिका प्रस्तावित असून, त्यापैकी २४९ सदनिकांची म्हाडा मार्फत जाहीरात देण्यात येऊन लाभार्थी निश्चित करण्यात आले आहे.

या व्यतिरिक्त चिराग नगर परिसरातील सर्व्हे क्र. ८३/१,३ व १२१ या भूखंडातील ३७८८० चौ.मि. क्षेत्र भोगवटादार वर्ग-१ स्वरुपाचे असून, सदर भूखंड मंजूर विकास योजनेनुसार रहिवास क्षेत्रामध्ये समाविष्ट होत आहे. सदर भूखंड क्षेत्र नागरी जमीन धारणा अधिनियम, १९७६ कलम २० खाली आदेश पारित असून, त्यानुसार रहिवास प्रयोजनार्थ विकसनाकरीता जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३०/०८/२०२२ रोजी दिलेल्या परवानगीनुसार ८० चौ.मि. क्षेत्राच्या मर्यादेत सदनिका नियोजित करुन दाखल केलेल्या प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेने मंजूरी दिलेली आहे.

त्याव्यतिरिक्त विकास आराखड्यानुसार रहिवास विभागामध्ये असणाऱ्या भूखंडाच्या ३/०८/२ बी नुसार मूळ चटई क्षेत्राच्या २०% क्षेत्र आर्थिक दुर्बल घटकासाठी (EWS) ४४ सदनिका प्रस्तावित आहेत, या सदनिकांचे वितरण म्हाडा मार्फत करण्याचे प्रस्तावित राहिल.

तसेच जे.के. इन्व्हेस्टो ट्रेड (इंडिया) लि. या कंपनीचे ७८३१० चौ.मि. क्षेत्र (Industrial to Residitional) औद्योगीक मधून रहिवास/ वाणिज्य करीता जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक १८/१०/२०१९ व दिनांक २३/१०/२०१९ च्या आदेशास अनुसरुन ठाणे महानगरपालिकेने अभिन्यासास मंजूरी दिली आहे. तथापि, सदर भूखंडावर अद्याप इमारतींकरीता बांधकाम आराखडे मंजूर करण्यात आलेले नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) मे. रेमंड जे.के. ग्राम, सेवानिवृत्त कर्मचारी निवास संघर्ष समिती (नियो.) यांचेकडून दिनांक ०९/०५/२०२३ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयातील मा.मुख्यमंत्री सचिवालय कक्षामध्ये विनंती अर्ज प्राप्त झाला आहे.

(४) मुंबईतील गिरणी कामगारांच्या धर्तीवर रेमंड वुलन मिल (लि.), जे.के.ग्राम व जे.के. इन्व्हेस्टो ट्रेड (इंडिया) लि. या गिरणीतील कामगारांना सवलतीच्या दरात सदनिका देणेबाबतचा कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत म्हाडा प्राधिकरणाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील तापी पाटबंधारे महामंडळ अंतर्गत भागपूर धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(५४) * २०१२३ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील तापी पाटबंधारे महामंडळ अंतर्गत असलेल्या भागपूर धरणाचे काम २३ वर्षांपूर्वी सुरु करण्यात आले असून अद्यापही अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाचे आतापर्यंत किती बांधकाम पूर्ण झाले असून, त्यावर किती निधी खर्च करण्यात आला व किती बांधकाम अपूर्ण आहे व त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, सदर धरणाचे काम बंद असल्याने पाणी प्रकल्पाची किंमत वाढून शासनाचे नुकसान होत असल्याने सदर प्रकल्प तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाकडून काय कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, खरे आहे.

(२) जळगांव जिल्ह्यातील भागपूर धरणाचे ४१% व उपसा प्रणालीचे १७.५% बांधकाम झाले आहे. धरणावर रुपये २९२.४ कोटी, उपसा प्रणालीवर रुपये ११५.२९ कोटी असा बांधकामावर माहे जून, २०२३ अखेर एकूण रुपये ४०७.६९ कोटी खर्च झालेला आहे. उर्वरीत कामासाठी प्रस्तावित प्रथम सुप्रमा नुसार अंदाजे रुपये १८५५ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(३) काम प्रगतीत आहे. काम पूर्ण करण्यासाठी चालू वर्ष सन २०२३-२०२४ मध्ये रुपये ७५ कोटी निधीची तरतुद असून, उर्वरीत खर्च करण्यासाठी प्रस्तावित प्रथम सुप्रमा (दरसुची वर्ष २०१८-१९) नुसार अंदाजे रुपये १८५५ कोटी निधीची आवश्यकता आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.